# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | गुरुवार । दि. ८ ऑक्टोबर २०२६ । अंक १२२ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## 'साखर कारखाने १५ नोव्हेंबरपूर्वी सुरू करू नये'




**कोल्हापूर :** राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती असताना सरकारने १५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न करू नये. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पान ५ वर

## राहुल गांधी, प्रियंका गांधी पोलिसांच्या ताब्यात

**नवी दिल्ली :** राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रियांका गांधी या रस्त्यावर झोपल्या होत्या. यावेळी वातावरण तापलेलं पाहायला मिळाले. खासदारांसोबत अशी वर्तणूक होत आहे. खासदारांना पोलीस मारतात, हे सर्व काय सुरु आहे. आम्हाला फक्त जंतरमंतरवर आंदोलन करायचं होतं. पण तेही का करु देत नाहीत, असं प्रियांका गांधी यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आता राहुल आणि प्रियांका गांधी दोघेही पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यांना अक्षरः उचलून पोलिसांच्या गाडीत नेण्यात आले. दिल्लीमध्ये हे आंदोलन सुरु आहे. पान ५ वर

# 'या साहेब! हॉल तिकीट दाखवतो'

## सत्ताधाऱ्यांच्या आरोपावर विवेकानंद पाटील सरकारवर भडकले

प्रमोद जाधव/सायली पाटील । पुणे ।

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात ७० टक्के राजकीय लोक असून केवळ २० टक्के विद्यार्थी सहभागी आहेत, अशी टीका सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आल्यानंतर विद्यार्थी आंदोलक विवेकानंद पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. 'या साहेब! हॉल तिकीट दाखवतो', असे थेट आव्हान देत पाटील यांनी आंदोलनातील विद्यार्थी सहभागाबाबत केलेल्या आरोपांना कृषीवलच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले.

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनावर सत्ताधाऱ्यांकडून राजकीय आरोप केले जात असल्याने पान ५ वर



### ...अन्यथा आंदोलन तीव्र होईल

अध्यक्षांनी राजीनामा न दिल्यास पुढील रणनीतीबाबत रोहित पवार निर्णय घेतील. आंदोलन सामूहिक असून त्याची धार आणखी तीव्र करण्याचा प्रयत्न केला जाईल, असा इशाराही पाटील यांनी दिला. सरकार या संवेदनशील प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### एमपीएससीची संपूर्ण बॉडीच रिस्ट्रक्चर करा!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संपूर्ण यंत्रणेचे पुनर्रचना करून त्यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत, अशी मागणी विद्यार्थी आंदोलक विवेकानंद पाटील यांनी केली. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली.

### पदाची गरिमा राखा

एमपीएससीने यूपीएससीचा केवळ अभ्यासक्रम नव्हे, तर संरचना स्वीकारावी, अशी मागणीही त्यांनी केली. पदावर कोणीही असावे; मात्र त्यांनी पदाची गरिमा आणि पारदर्शकता राखावी.

## 'विद्यार्थी समाजकंटक नाहीत'

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भोंगळ कारभाराविरोधात, परीक्षांमधील गैरव्यवहार आणि रखडलेल्या भरतीप्रक्रियेविरुद्ध पुण्यातील स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाची मुंबई उच्च न्यायालयाने पाठराखण केली असून आंदोलन करणारे विद्यार्थी समाजकंटक नाहीत, असे म्हणत न्यायालयाने राज्य सरकारला खडेबोल सुनावले. भरती परीक्षा निष्पक्ष, पारदर्शक आणि कोणत्याही गैरप्रकाराशिवाय पार पाडण्याची जबाबदारी राज्य सरकारची असल्याचेही न्यायालयाने म्हटले. तसेच विद्यार्थ्यांचा परीक्षांवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी सरकारने प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. पुण्यात आंदोलनामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील रहिवासी अमित सुपेकर आणि सौरभ वीरकर यांनी याचिका दाखल केली आहे. या याचिकेत राज्य सरकारसह आंदोलनाचे आयोजक प्रमोद पाटील, नितीन अंधाळे आणि चेतन वाघज यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. सार्वजनिक भरतीच्या परीक्षा घेताना त्या निष्पक्ष, पारदर्शक आणि कोणत्याही गैरप्रकाराशिवाय होतील, याची राज्य सरकारने खात्री द्यायला हवी, असे खंडपीठाने स्पष्ट केले. पान ५ वर

## वेधक

### सुकापुरातील क्लबवर छापा

**पनवेल :** पनवेल सुकापूर येथील राज वेल्फेअर सोशल क्लबमध्ये सुरू असलेल्या कथित बेकायदा जुगारावर गुन्हे शाखा कक्ष-२च्या पथकाने छापा टाकत कारवाई केली. तेरा पानी रमीचा डाव सुरू असताना केलेल्या या कारवाईत क्लबचा मॅनेजर तसेच जुगार खेळणाऱ्या आणि व्यवस्थापनाशी संबंधित अशा एकूण २५ जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान २७ हजार ९०० रुपयांची रोकड आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. क्लबच्या मुख्य चालकाचे नाव एफआयआरमध्ये समाविष्ट नसल्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### अतिक्रमणांवर हातोडा

**कळंबोली :** कळंबोली नोडमधील अनधिकृत बांधकामे आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने धडक निष्कासन मोहीम राबवली. या कारवाईत सेक्टर १० ई व स्टील मार्केट परिसरातील विविध अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. तसेच खिडूकपाडा चौकातील वाहतुकीला अडथळा ठरणारे अनधिकृत स्टॉल्स हटवण्यात आले. सेक्टर १० ई व स्टील मार्केट परिसरात २ गॅरेज शेड, ३ कॅन्टीन शेड, १ गॅरेज कंटेनर, १ ढाबा, २ गॅरेज तसेच टायर रिपेअरिंग स्टॉल हटवण्यात आले. याशिवाय खिडूकपाडा चौक परिसरात वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

### पोलीस उपनिरीक्षकाने संपविले जीवन

**पुणे :** पुणे पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षकाने औंधमधील राहत्या घरी शासकीय पिस्तुलातून गोळी झाडून जीवन संपविल्याची घटना बुधवारी (दि. ७) दुपारी घडली. निलेश पाटील असे आत्महत्या केलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. आत्महत्येमागचे निश्चित कारण अद्याप समजू शकलेले नाही. पाटील हे विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. पोलीस दलात भरती झाल्यानंतर पदोन्नतीने ते पोलीस उपनिरीक्षक झाले होते. बुधवारी उच्च न्यायालयातील कामासाठी त्यांना मुंबईला जायचे होते. मात्र, ते मुंबईला गेले नाहीत.पाटील हे नागरस रस्त्यावरील एका सोसायटीत कुटुंबासह राहत होते.

## चार कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त

- तीन तस्करांना ठोकल्या बेड्या
- श्रीवर्धन पोलिसांची कारवाई

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध वन्यजीव तस्करीविरोधात अत्यंत दमदार कामगिरी बजावत सुमारे ३ कोटी ९६ लाख ६० हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे. या धडक कारवाईत एकूण ३.९६० किलोग्राम व्हेल माशाची उलटी आणि गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, जीवना कोळीवाडा येथील ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सायंकाळी सुमारे ५ वाजता श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका मोटरसायकलवरून बेकायदेशीरपणे व्हेल माशाची उलटी वाहून नेली जात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख व त्यांच्या पथकाने तत्काळ जीवना पार नाका, श्रीवर्धन येथे नाकाबंदी करून मोटरसायकल अडवली. मोटारसायकल चालक विराज महेंद्र चौलकर याच्याकडे विचारपूस व झडती घेतली असता, पान ५ वर

## स्मार्ट मीटरविरोधात शेकापचे रणशिंग

### आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अलिबागेत पदाधिकाऱ्यांची बैठक




। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने स्मार्ट मीटरविरोधात होणाऱ्या आंदोलनाची जोरदार तयारी सुरू झाली असून, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.७) अलिबाग येथील शेकाप भवनमध्ये प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शेकापच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाची दिशा स्पष्ट करत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षय नाईक, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, तालूका चिटणीस सुरेश घरत, माजी तालूका चिटणीस अनिल शांताराम पाटील, अलिबाग पंचायत समितीचे सदस्य अंजली ठाकूर, नगर परिषद पाणी सभापती अनिल चोपडा, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, ॲड.नीलम हजारे, ॲड. परेश देशमुख, पान ५ वर

(संबंधित वृत्त पान ३ वर)

### हुकूमशाही उलथून टाकण्यासाठी सज्ज व्हा - चित्रलेखा पाटील

स्मार्ट मीटरच्या नावाखाली मोठा स्कॅम सुरु आहे. सर्वसामान्यांच्या घरात घूसून त्यांच्या तिजोरीतून पैसे काढण्याचा डाव सुरु आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक हतबल झाले आहेत. जोपर्यंत शेतकरी कामगार पक्ष सर्वसामान्यांच्या सोबत आहे, तोपर्यंत कोणीही हतबल होऊ नका. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठा लढा आपण स्मार्ट मीटर विरोधात देणार आहोत. त्याची तयारी गेल्या अनेक दिवसांपासुन सुरू आहे. तालुका स्तरावर बैठका घेऊन स्मार्ट मीटरच्या विरोधात रणशिंग फुंकण्याचे काम सुरु झाले आहे. जिल्ह्यातील जनतेकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. नारायण नागू पाटील यांनी त्यावेळी खोतांविरोधात लढा देऊन शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून दिला. आता तोच वारसा घेत या कार्पोरेट खोतांना घालविण्यासाठी रस्त्यावर पान ५ वर

## कळंबोलीत ध्वनी प्रदूषणाचा वाढता ताण

- मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग परिसरात ७८.३ डेसिबलची नोंद
- वाहतूक, बांधकाम आणि धुळीमुळे नागरिक हैराण

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहराचा झपाट्याने होत असलेला विकास आणि वाढती वाहनांची वर्दळ याचा पर्यावरणावर परिणाम होत असल्याचे महापालिकेच्या पर्यावरण सद्यःस्थिती अहवालातून समोर आले आहे. कळंबोली परिसरातील मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाजवळ ७८.३ डेसिबल ध्वनीची नोंद झाली असून, निवासी क्षेत्रासाठी दिवसा निर्धारित ५५ डेसिबलच्या मर्यादेच्या तुलनेत ही पातळी अधिक आहे.

पनवेल शहर केंद्रात ७४.५ डेसिबल, तर खांदेश्वर स्टेशन रस्त्यावर ६९.२ डेसिबल ध्वनीची नोंद झाली आहे. शहरातील विविध निरीक्षणस्थळांपैकी ४६ टक्के ठिकाणी दिवसा निर्धारित ध्वनी मर्यादा ओलांडल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे वाढती वाहतूक आणि शहरीकरणामुळे ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत असल्याचे चित्र आहे.

कळंबोली सर्कल परिसरातून मुंबई, पुणे, पनवेल, नवी मुंबई आणि तळोजा औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. अवजड वाहनांची सतत ये-जा, वाहतूक कोंडी, वाहनांचे हॉर्न तसेच सुरू असलेली विविध बांधकामे यामुळे परिसरातील आवाजाची पातळी वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ध्वनी प्रदूषणाबरोबरच हवेतील धूलिकणांचाही प्रश्न कायम आहे. रस्त्यांवरील धूळ, बांधकामातून निर्माण होणारी धूळ आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे कळंबोलीसह पनवेलच्या अनेक भागांत नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. अहवालानुसार हवेच्या प्रदूषणात रस्ते वाहतुकीचा ४६ टक्के, बांधकामाचा २० टक्के आणि धुळीचा १५ टक्के वाटा आहे.

कळंबोलीला लागून असलेल्या तळोजा औद्योगिक क्षेत्रामुळे औद्योगिक प्रदूषणाचाही मुद्दा महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे कळंबोलीतील प्रदूषणाचा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता पान ५ वर

## नरेंद्र गायकवाड यांच्यावर कथित शाईफेक



। बेणसे । प्रतिनिधी ।

रायगडच्या राजकीय वर्तुळात आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्यावर झालेल्या कथित शाईफेक प्रकरणाने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर गायकवाड यांनी संभाव्य धमकी, छळ, बनावट तक्रार दाखल होण्याची भीती व्यक्त करत रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन दिले आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पान ५ वर

## मध्यान्ह भोजनाचा पुरवठा ठप्प

। पेण । प्रतिनिधी ।

शासनाच्या मध्यान्ह भोजन आहार योजनेचा कारभार सध्या नियोजनाअभावी अडचणीत सापडला असून, शाळांना भोजन पुरविणाऱ्या महिला बचत गटांची आर्थिक कोंडी झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, जुलैपासून धान्याचा नियमित पुरवठा झालेला नसून तांदळाचा पुरवठा सप्टेंबरपर्यंतच झाला. तसेच तेलाचा पुरवठाही जून महिन्यापासून झालेला नसल्याचे सांगण्यात येत आहे.




विशेष म्हणजे, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाला जवळपास पाच महिने उलटूनही बचत गटांना मध्यान्ह भोजनाची एकही देयके मिळालेली नसल्याची स्थिती आहे. शासनाकडून वेळेवर धान्य आणि देयके मिळत नसतानाही महिला बचत गटांनी आपल्या परीने शाळांमध्ये भोजन सुरू ठेवले आहे.

एकीकडे महागाईने कडाडलेली असून भाजीपाला, किराणा आणि इतर साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. दुसरीकडे धान्य व तेलाचा पुरवठा अनियमित आणि बिलांची रक्कम थकीत असल्याने बचत गटांवर आर्थिक भार वाढत आहे. त्यामुळे यापुढे स्वतःच्या खिशातून खर्च करून विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवणे किती दिवस शक्य होणार? असा सवाल बचत गटांकडून उपस्थित केला जात आहे. मध्यान्ह भोजन योजनेच्या नियमांमध्ये प्रशासनाकडून कडकपणा अपेक्षित असताना, नियमांची अंमलबजावणी करताना बचत गटांना वेळेवर धान्य आणि देयके मिळत आहेत का, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांच्या पोषणाशी निगडित असलेल्या पान ५ वर

## राष्ट्रवादीची हक्काची जागा निसटली

### सामुहिक अपयश असल्याची सुनील तटकरे यांची कबुली

। मुंबई । प्रतिनिधी ।

पुणे पदवीधर मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेसची हक्काची होती. मात्र, ही जागा पक्षाला मिळाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी आम्ही नक्कीच कमी पडलो असून, हे आमचे सामूहिक अपयश मानले पाहिजे, अशी कबुली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज दिली. दरम्यान, महायुती म्हणूनच ही निवडणूक लढविली जावी, यासाठी चर्चा सुरू ठेवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विधानपरिषदेसाठी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख नऊ ऑक्टोबर आहे. त्यामुळे अद्याप चर्चेची संधी आहे. ही निवडणूक महायुती म्हणून लढविली गेली पाहिजे. ही आपली भूमिका असून पक्षांतर्गत चर्चा केल्यानंतर गरज पडल्यास मुख्यमंत्री तसेच केंद्रातील नेतृत्वाचीही भेट घेऊ, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

पुणे पदवीधर मतदारसंघाची जागा न मिळाल्यामुळे राष्ट्रवादीची वाटाघाटीची क्षमता कमी झाली, असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल, असेही तटकरे यांनी सांगितले. पुणे पदवीधरची जागा राष्ट्रवादीला मिळावी, असा पक्षाचा आग्रह सुरुवातीपासून होता. पान ५ वर

## ऑनलाईन पासला क्यूआर कोडची सुविधा | पाससोबत वैध ओळखपत्र बंधनकारक

# लालपरीतून करा 'आवडेल तेथे प्रवास'

। रायगड प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे (एसटी) प्रवाशांना अद्ययावत सुविधांसह विविध सवलती उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रवास अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने महामंडळाने आवडेल तेथे प्रवास ही योजनाही आता ऑनलाइन केली आहे. त्यामुळे प्रवाशांना घरबसल्या चार किंवा सात दिवसांचा पास काढता येणार असून, पास काढण्यासाठी आगारात जाण्याची किंवा तिकीट खिडकीवर रांगेत उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

आवडेल तेथे प्रवास योजनेंतर्गत चार आणि सात दिवसांचे पास दिले जातात. या पासच्या माध्यमातून राज्यात इच्छित ठिकाणी प्रवास करता येतो. यापूर्वी हे पास आगारातून हस्तलिखित पद्धतीने वितरित केले जात होते. त्यामुळे पास काढण्यासाठी प्रवाशांना तिकीट खिडकीवर रांगेत उभे राहावे लागत होते. आता ऑनलाइन सुविधा उपलब्ध झाल्याने प्रवाशांचा वेळ, श्रम आणि पैशांची बचत होणार आहे. प्रवाशांना महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर आवश्यक माहिती भरून ऑनलाइन पास काढता येणार आहे. या प्रणालीद्वारे चार आणि सात दिवसांचे आवडेल तिथे प्रवास पास उपलब्ध आहेत.




ऑनलाइन काढलेला पास प्रिंट स्वरूपात किंवा मोबाईलमधील पीडीएफ स्वरूपात प्रवासासाठी वैध मानला जाणार आहे. प्रवासादरम्यान वाहक ईटीआय मशिनद्वारे पासवरील क्यूआर कोड स्कॅन करून त्याची पडताळणी करणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी ऑनलाइन पाससोबत वैध ओळखपत्र बाळगणे बंधनकारक आहे.

## टोरंटसाठीची सुनावणी शेतकऱ्यांनी उधळली



। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात प्रस्तावित टोरंट जलविद्युत प्रकल्पासाठी भालीवडी ते सायडोंगर दरम्यान करण्यात येणाऱ्या ५.९१ किलोमीटर लांबीच्या पोहोच रस्त्यामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांची जनसुनावणी बुधवारी (दि. ७) कर्जत तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. मात्र, हा रस्ता कशासाठी आणि कोणाच्या मागणीनुसार केला जात आहे? असा थेट सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित पान ५ वर

# पनवेलला प्रदूषणाचा विळखा

## पर्यावरण अहवालात हवा गुणवत्ता निर्देशांकाकडे बोट

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिका क्षेत्र प्रदूषणाच्या विळख्यात अडकल्याचे पर्यावरणीय सद्यःस्थिती अहवालतून उघड झाले आहे. मंगळवारी पनवेल महापालिकेच्या महासभेत हा अहवाल मांडण्यात आला. यावेळी अहवालावर सभागृहातील सदस्यांना अभ्यास करण्यासाठी अजून वेळ सत्ताधारी बाकांवरील सदस्यांनी मागितल्याने हा विषय स्थगित करण्यात आला.

वेगाने होणारे नागरीकरण, वाढती वाहतूक, बांधकामाची धूळ, ध्वनी प्रदूषण आणि जलस्रोतांवरील वाढता ताण हे पनवेलच्या पर्यावरणासमोरील प्रमुख प्रश्न असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. मागील वर्षी जानेवारी ते मे या कालावधीत पनवेलचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १०० होता.

पीएम २.५ आणि पीएम १० या प्रदूषकांचे प्रमाण अनुक्रमे ४८ आणि ८२ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर नोंदले गेले असून, ते केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अनुक्रमे ४० आणि ६० या वार्षिक मानकांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत इतर वाहतूकीत सर्वाधिक वाहनसंख्येमुळे आणि बांधकाम क्षेत्रामुळे अधिक धूळ निर्माण करणाऱ्या पनवेलच्या सरकारी प्रशासनाला धूळ नियंत्रणाकडे अधिक लक्ष द्यावे लागणार आहे.

पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी मांडलेल्या अहवालानुसार रस्ते वाहतूक हा वायूप्रदूषणाचा सर्वाधिक म्हणजे ४६ टक्के स्रोत आहे. बांधकाम ातून २० टक्के, रस्ते व मोकळ्या जागेतील धुळीतून १५ टक्के, औद्योगिक क्षेत्रातून १० टक्के आणि कचरा जाळण्यामुळे पाच टक्के प्रदूषण पनवेलमध्ये होत असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

त्यामुळे बांधकामस्थळी धूळ नियंत्रण, नियमित यांत्रिक रस्ते सफाई, सार्वजनिक वाहतूक व स्वच्छ वाहतुकीला प्रोत्साहन, औद्योगिक उत्सर्जनावर नियंत्रण आणि रस्त्यालगत हरित पट्टा वाढविण्याची शिफारस करण्यात आली आहे. ध्वनी प्रदूषणात पनवेल शहर केंद्राची दिवसा सरासरी ७४.५ डेसिबल, कळंबोलीजवळ मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ७८.३ आणि खांदेश्वर स्टेशन रस्त्यावर ६९.२ डेसिबल नोंद झाली. निवासी क्षेत्रासाठी दिवसाचे मानक ५५ डेसिबल असताना एकूण ४६ टक्के निरीक्षणस्थळांवर दिवसाचे आणि ३४ टक्के ठिकाणी रात्रीचे मानक ओलांडले गेले. वाहतूक हा ६७ टक्के, तर बांधकाम १८ टक्के ध्वनीचा स्रोत आहे.

जल प्रदूषणाचा प्रश्नही गंभीर आहे. त्याचाही उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे. गणेशोत्सवासहीत इतर सणांच्या काळात पनवेल खाडी, खांदेश्वर तलाव आणि कळंबोली नाला, तसेच अन्य विसर्जनस्थळी पाण्याच्या गुणवत्तेत बदल झाला. पनवेल खाडीत विसर्जनादरम्यान विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण ५.६ वरून ३.२ मिलीग्रॅम प्रतिलिटर झाले, तर बीओडी ३ वरून ७.८ आणि विष्ठा कोलिफॉर्म २४० वरून ३२०० एमपीएन/१०० मिलीपर्यंत वाढला. त्यामुळे शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यासारखे उपाय या अहवालात मांडण्यात आले.

पनवेलमधील जमिनीच्या वापरातही बदल होत असल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. २०२२ ते २०२५ या तीन वर्षांत बांधकाम क्षेत्र ४०.२ वरून ४२.६ टक्क्यांवर वाढले. मात्र, अहवालानुसार शेती/वनस्पती क्षेत्र १८.९ वरून १९.५ टक्क्यांवर गेल्याचे नमूद करण्यात आले आहे. सर्वात ज्वलंत प्रश्न सध्या पनवेलकरांना पिण्याच्या पाण्याचा भेडसावत असून पिण्याच्या पाण्याची पनवेलकरांची मागणी १९४ दश लक्ष लीटर (एमएलडी) असून पुरवठा १६२ एमएलडी होत असून ३२ एमएलडीची, अर्थात १६ टक्क्यांची तूट आहे. गळती कमी करणे, पावसाचे पाणी साठवणे, भूजल पुनर्भरण आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.

### नागरिकांसह प्रशासनाला सूचना

पनवेलकरांनी कचरा जाळू नये, पाणी वाया घालवू नये, जलस्रोतांमध्ये निर्माल्य किंवा मूर्ती विसर्जित करू नये, अनावश्यक वाहनांचे हॉर्न व मोठ्या आवाजातील उपकरणांचा वापर टाळावा आणि बांधकामातून होणाऱ्या धुळीबाबत प्रशासनाकडे तक्रार करावी, अशा सूचना या अहवालात करण्यात आल्या आहेत. तसेच महापालिकेने हवा व ध्वनीचे नियमित निरीक्षण करावे, बांधकामस्थळी धूळ नियंत्रण बसवावे, जलस्रोतांचे प्रत्यक्ष वेळेआधारित परीक्षण करावे, गळती नियंत्रण, पावसाचे पाणी साठवण, हरित पट्टे निर्माण करणे, शांतता क्षेत्रांची अंमलबजावणी आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करण्याची सूचना या अहवालात करण्यात आली आहे.

### वायू प्रदूषणाचे स्रोत

रस्ते वाहतूक ४६ टक्के
बांधकाम २० टक्के
मोकळ्या जागेतील धूळ १५ टक्के
औद्योगिक क्षेत्र १० टक्के
कचरा जाळणे ५ टक्के

# शेकापचा विद्यार्थी हितासाठी पुढाकार

**। वाडा । प्रतिनिधी ।**



वाडा तालुक्यातील सोनशिव येथील शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाडा शहरातील शाळा व महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी नियमित बससेवा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विद्यार्थ्यांची ही गंभीर समस्या लक्षात घेऊन शेतकरी कामगार पक्ष प्रणित पुरोगामी विद्यार्थी संघटनेने पुढाकार घेतला. यावेळी जिल्हा चिटणीस सचिन मुकणे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली पुरोगामी विद्यार्थी संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन वाघमारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी मंगळवारी (दि.६) येथील विद्यार्थ्यांसह तालुक्यातील प्रमुख शासकीय कार्यालयांमध्ये निवेदन सादर करून तात्काळ बससेवा सुरू करण्याची मागणी केली.

या आंदोलनात्मक मागणीला प्रतिसाद देत सोनशिव गावातील किमान ५० शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या विद्यार्थ्यांनी शेकापच्या विचारधारेवर आणि पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या कार्यावर विश्वास ठेवून आपल्या न्याय मागणीसाठी एकजूट दाखवली.त्यानंतर संबंधित वाडा बस आगारप्रमुखांशी चर्चा करून विद्यार्थ्यांसाठी तात्काळ बससेवा सुरू करण्याची मागणी सचिन मुकणे यांनी केली. तसेच, उपविभागीय अधिकारी तथा प्रांत अधिकारी यांच्या कार्यालयात विद्यार्थ्यांसह कार्यकर्त्यांनी भेट देऊन निवेदन सादर केले. यावेळी सचिन मुकणे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, विद्यार्थ्यांची बससेवा तात्काळ सुरू करावी. अन्यथा शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वर्गच विभागीय कार्यालयात भरविण्याचे आंदोलन करण्यात येईल. या मागणीची दखल घेत प्रांत अधिकाऱ्यांनी संबंधित आगार व्यवस्थापकाशी तात्काळ चर्चा करून बससेवेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संबंधित आगारप्रमुखांनी कार्यकर्त्यांशी संपर्क साधून बुधवारी (दि.७) सकाळपासून विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.


सूक्ष्म,लघु और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
Government of India.
Khadi India

**बेरोजगार युवक / युवती / महिला / कारागिरांकरिता स्वयम रोजगाराची सुवर्ण संधी**

खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा मूळ उद्देश रोजगार देणे, विक्रीसाठी वस्तूंचे उत्पादन आणि जनते मध्ये आत्मनिर्भरता तसेच सुदृढ ग्राम स्वराज्याची भावना निर्माण करणे हा आहे. राज्य कार्यालय, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांच्या वतीने ग्रामोद्योग विकास योजनेंतर्गत 18 ते 55 वर्षे वयोगटातील बेरोजगार युवक/युवती/महिला/विविध क्षेत्रामध्ये काम करीत असणाऱ्या कारागिरांकडून खालील तक्त्यानुसार विविध कार्यक्रम/उद्योगांतर्गत अर्ज मागविले जात आहेत.

| अ. क्र | कार्यक्रम / उद्योगाचे नाव | कार्यक्षेत्राच्या अंतर्गत दिले जाणारे प्रशिक्षण तसेच वितरित केले जाणाऱ्या टूलकिट / यंत्रांचे विवरण वर्ष 2026-27 साठी |
|---|---|---|
| 1 | एम बी आय | विद्युतचलित कुंभार चाक |
| 2 | सेवा क्षेत्र | इलेक्ट्रिशियन / प्लंबर / शिलाई मशीन |
| 3 | ए बी एफ पी आय | व्हिलेज ऑईल / केन आणि बांबू / मसाले आणि पदार्थ |
| 4 | रेन्टी | वेस्ट वुड क्राफ्ट / टर्न वुड क्राफ्ट |
| 5 | हनी मिशन | मधमाशी पालन |
| 6 | एच एम पी एफ आय | पेपर / द्रोण पत्रावळी मशीन / हँड मेड पेपर कन्व्हर्शन |
| 7 | पी सी बी आय आय / डब्ल्यू सी आय | ऑटोमॅटिक अगरबत्ती मशीन |
| 8 | पी सी बी आय | लेदर / फुटवेअर मशीन व टूलकिट |

टीप: 1) सदर योजने अंतर्गत सामान्य / ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या 20 टक्के, अजा / अज लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या 10 टक्के आणि बीपीएल धारकांना शून्य टक्के लाभार्थी हिस्सा (own contribution) कार्यालयामध्ये जमा करावे लागतील. 2) प्रथम प्राप्त अर्जांना प्राधान्य दिले जाईल. 3) लाभार्थ्यांची निवड राज्यस्तरीय समितीद्वारे केली जाईल. समितीचा निर्णय अंतिम तसेच बंधनकारक असेल. आपले अर्ज खालील दिलेल्या पत्त्यावर व ई-मेलवर पाठवावे.

– संचालक

**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
नॅशनल इन्शुरन्स बिल्डिंग, 9वा मजला, 14 जे.टी. रोड, चर्चगेट, मुंबई – 400 020.
टेलि/फॅक्स: +91 22 22817449 Email: somkvicbom@yahoo.com


### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१) लवाद दावा क्रमांक ९०७/२०२५ मधील दिनांक १६/०२/२०२६ रोजीचा वसुली दाखला
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)
३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/१५६/९५/२०२६ दि.०५/०३/२६

जा.क्र./एस.आर्.ओ./५११/ सन २०२६
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि. रायगड फोन न. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०८/१०/२०२६

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड यांनी लवाद वसुलीदाखला क्रमांक ९०७/२०२५ मधील दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या वसुलीदाखल्यात नमुद केलेप्रमाणे सौ.आरती मनीष हार्डे यांनी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये १९,१८,०६७/- + व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे सौ. आरती मनिष हार्डे यांची जामिनदरा/सहमंतीदार श्री. सुधाकर माया हार्जे यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाडयाची किंवा आदेशाचा क्रं व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| ९०७/२५<br>१६/०२/२६ | १. श्री./सौ.आरती मनीष हार्डे मु.पो.चाळमळा, थळ, ता. अलिबाग जि. रायगड<br>२. श्री/सौ. सुधाकर माया हार्डे मु.चाळमळा थळ, ता.अलिबाग जि. रायगड<br>३.श्री.सौ. अंकेत भगवान बानकर मु.वरसोली कोळीवाडा, ता. अलिबाग, जि. रायगड | सौ.आरती मनीष हार्डे मौजे थळ ता.अलिबाग जि. रायगड हद्दीतील गट ग्रामपंचायत थळ येथील मौजे थळ मालमत्ता क्र. ३९ क्षेत्र १३४.९४ चौ.मी. दगड विटा मातीचे पक्के बांधकाम ही मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

सिल

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी रायगड-अलिबाग**

### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१) लवाद दावा क्रमांक ९३७/२०२५ मधील दिनांक २४/०२/२०२६ रोजीचा वसुली दाखला
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)
३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/ १५६/९३/२०२६ दि.०५/०३/२६

जा.क्र./एस.आर्.ओ./५१०/ सन २०२६
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि. रायगड फोन न. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०८/१०/२०२६

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड यांनी लवाद वसुलीदाखला क्रमांक ९३७/२०२५ मधील दिनांक २४/०२/२०२६ रोजीच्या वसुलीदाखल्यात नमुद केलेप्रमाणे श्री.रामा हिरा कोळी यांनी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये ४१,३३,१८९/- + व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे श्री.रामा हिरा कोळी यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाडयाची किंवा आदेशाचा क्रं व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| ९३७/२५<br>२४/०२/२६ | १. श्री./सौ.रामा हिरा कोळी मु.पो.साईबाबा मंदिराजवळ बोडणी ता.अलिबाग जि.रायगड<br>२. श्री/सौ.अंकुश पांडुरंग कोळी मु. साईबाबा मंदिराजवळ बोडणी ता.अलिबाग जि.रायगड<br>३.श्री/सौ.आशिष मोतीराम कोळी मु. साईबाबा मंदिराजवळ, बोडणी ता.अलिबाग जि.रायगड | श्री. रामा हिरा कोळी मौजे पालेखुर्द ता.रोहा जि.रायगड हद्दीतील मौजे पालेखुर्द गटक्रमांक व उपविभाग १९२ क्षेत्र वरकस ०-८९-०० पो.ख. ०-२१-०० एकुण १-१०-०० आकारणी ०.५० हि मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

सिल

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी रायगड-अलिबाग**

### Tender Notice

All India Institute of Local Self-Government [AIILSG] invites tenders for the project "Innovations for Environment & Climate Action through Solar Energy Use for Enabling Access to Drinking Water, Solar Electrification & Bal-TARFAH for Empowering Rural cum Tribal Communities."

Tender invited for: Supply, Installation, Testing, Commissioning [SITC], Maintenance and Repair of Solar-enabled Drinking Water Scheme.

- Location: Madap Thakurwadi, Khalapur Block in Raigad District of Maharashtra State.
- Last Date & Time of Submission: 15th October 2026 latest by 10:30 am.
- For complete details refer to the 'Tender' section at- https://www.aiilsg.org/tender.html

### ग्रामपंचायत पहेल,ता.माणगाव,जि.रायगड

ग्रामपंचायत पहेल १५ व्या वित्त आयोग व दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक ०८/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सीलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ. क्र | कामांचे नाव | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १) | सुरेश घरटकर ते समीर मांडवकर गटार बांधणे | १५वा वित्त आयोग | ७५०००/- | ७५० | २०० |
| २) | रा.जी.पं.शाळा,अंगणवाडी,ग्रामपंचायत सोलार पॅनल बसविणे | १५वा वित्त आयोग | १३५५६०/- | १३५५ | २०० |
| ३) | पहेल गावं अंतर्गत रस्ता तयार करणे | १५वा वित्त आयोग | १७६०५३/- | १७६१ | २०० |
| ४) | तुकाराम मांजरे ते संभाजी मांजरे रस्ता तयार करणे | १५वा वित्त आयोग | १०८९२४/- | १०८९ | २०० |
| ५) | महिषासुर मर्दिनी मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | १५%मागासवर्गीय | ६०४०६/- | ६०४ | २०० |

**अटी आणि शर्ती**

१.दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि.०८/१०/२०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वा नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३.प्राप्त दरपत्रके दि.०९/१०/२०२६ रोजी दुपारी १२ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थीतासक्षम सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. व बिलाची रक्कम ग्रामपंचायतिकडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४. साहित्य उत्तम दर्जाचे (आयेसाय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे, पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५. कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**कु.अनिता श्रीमंत साखरे**
**ग्रामपंचायात पहेल**

सही/-
**सरपंच**
**सौ.करिश्मा प्रसाद मांजरे**
**ग्रामपंचायत पहेल**

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.जनार्दन कमळु कोंळबे, श्री.जयवंत जयराम ठाकुर, श्री.राम कमळु कोंळबे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नसरापूर, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४६ एकुण १.४०.६० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.९८.६० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश अगरवाल, प्लॉट नं. ४६ ते ५०, सेक्टर- ०८, नवीन पनवेल | ०१ जंगली झाड पुनर्रोपण व ०१ सुकलेले मृत (बदाम) झाड तोडणे अशी एकूण ०२ झाडे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ४६ ते ५०. सेक्टर-०८. नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे भूखंडाच्या बाहेरील गेट समोरील ०२ झाडे वाहने आत-बाहेर करणेस बाधित होत आहे. |
| २. | M/s.Shreeyut Developers. Plot No.38A. Sec 35E. Kharghar | ०१ आंबा झाड तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Plot No.38A. Sec 35E. Kharghar या भूखंडाच्या आवारातील ०१ झाड नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.PMC-PARK / 557/2026-PTAD

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| कामार्ले | ५७ | ०-३६-९० | ९.१२ | १) मंगेश घनशाम कवळे.<br>२) माधव घनशाम कवळे.<br>३) माधूरी भिकू कामत.<br>४) सुगंधा चंद्रशेखर राऊत. |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०८/१०/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१) लवाद दावा क्रमांक ३९३/२०२६ मधील दिनांक १५/०५/२०२६ रोजीचा वसुली दाखला
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)
३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/१५६/१२०/२०२६ दि.०१/०६/२६

जा.क्र./एस.आर्.ओ./५१२/सन २०२६
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि. रायगड फोन न. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०८/१०/२०२६

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड यांनी लवाद वसुलीदाखला क्रमांक ३९३/२०२६ मधील दिनांक १५/०५/२०२६ रोजीच्या वसुलीदाखल्यात नमुद केलेप्रमाणे सौ.संचिता केतन बानकर यांनी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता. अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये ३१,८२,९८१/-+ व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे सौ. संचिता केतन बानकर यांची सहमंतीदार श्रीमती सुंदराबाई बाळकृष्ण भगत यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाडयाची किंवा आदेशाचा क्रं व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| ३९३/२६<br>१५/०५/२६ | १.श्री./सौ. संचिता केतन बानकर मु.पो.वरसोली कोळीवाडा,वरसोली ता.अलिबाग, जि. रायगड<br>२.श्री./सौ.गोकुळ हरिदास कोळी मु.बंदराजवळ, बोडणी, ता. अलिबाग, जि. रायगड<br>३.श्री./सौ.आरती मनीष हार्डे मु.चाळमळा, थळ, ता.अलिबाग जि.रायगड | सौ. संचिता केतन बानकर यांचे सहमंतीदार श्रीमती सुंदराबाई बाळकृष्ण भगत यांची मौजे वरसोली ता. अलिबाग जि. रायगड हद्दीतील ग्रामपंचायत वरसोली हद्दीतील मालमत्ता क्र.६७४ क्षेत्र १३२० चौ.फुट ही दुमजली कौलारु छप्पर असलेली घर मिळकत व त्याखालील जमिन मौजे वरसोली भुमापन क्र.१५८/६३ क्षेत्र ०-०२-०० पोटखराबा ही मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

सिल

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी रायगड-अलिबाग**

## निवडक

### ऑनलाइन सेवांचा नागरिकांना फटका

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यात विविध शासकीय सेवांसाठी वापरण्यात येणाऱ्या संकेतस्थळांवर तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. शासकीय कामकाज मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन करण्यात आले असताना संकेतस्थळे बंद अथवा संथ असल्यामुळे




नागरिकांची अनेक कामे रखडत आहेत. भूमी अभिलेख विभागाशी संबंधित विविध कागदपत्रे व सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना अनेक कामांसाठी कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याऐवजी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येतो. मात्र, संबंधित संकेतस्थळावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास ही ऑनलाइन सुविधा नागरिकांसाठीच अडथळ्याची ठरत असल्याचे चित्र आहे. शासनाने नागरिकांच्या सोयीसाठी विविध सेवा ऑनलाइन केल्या आहेत. मात्र, सेवा मिळण्यासाठी आवश्यक असलेली संकेतस्थळाची यंत्रणाच बंद असल्यास नागरिकांनी करायचे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. साध्या स्वरूपाच्या कामांसाठीही चार-पाच दिवस प्रतीक्षा करावी लागत असून, काही वेळा आठ ते दहा दिवसांपर्यंत कामे रखडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### रेवदंड्यात 'ऑक्टोबर हिट'चा कहर

**रेवदंडा :** मोसमी पावसाने माघार घेताच रेवदंडा तसेच संपूर्ण अलिबाग तालुक्यात ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. सकाळीच जाणवणारा उकाडा, दिवसभर असलेला दमटपणा आणि दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही करणारे ऊन यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. थंडीची



चाहूल लागण्याची अपेक्षा असताना उलट वाढत्या तापमानामुळे 'ऑक्टोबर हिट'ची चर्चा गावागावांत सुरू झाली आहे. मात्र, हा केवळ नैसर्गिक बदल नसून, मानवनिर्मित पर्यावरणीय ऱ्हासाचेही गंभीर परिणाम असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. गेल्या काही वर्षांत रेवदंडा, चौल, नागाव, आक्षी आणि अलिबाग परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे, निवासी प्रकल्प, व्यावसायिक संकुले आणि सिमेंट-काँक्रीटच्या रस्त्यांचे जाळे वाढले आहे. विकासाच्या नावाखाली झाडे-झुडपे तोडली जात आहेत, डोंगर सपाट केले जात आहेत आणि मोकळ्या जागा वेगाने नष्ट होत आहेत. परिणामी परिसरातील नैसर्गिक शीतलता कमी होत असून उष्णता साठवून ठेवणाऱ्या काँक्रीटच्या संरचनांचे प्रमाण वाढल्याने तापमानात वाढ होत असल्याचे नागरिकांमधून बालले जात आहे. पर्यावरण अभ्यासकांच्या मते, झाडे, डोंगर आणि नैसर्गिक जलस्रोत हे परिसराचे नैसर्गिक वातानुकूलन यंत्र असतात. मात्र, त्यांचे अस्तित्व कमी होत असताना उष्णतेचा प्रकोप वाढणे ही चिंतेची बाब आहे.

### महिलांनी सोन्याची बांगडी चोरली

**नवीन पनवेल :** दोन बुरखाधारी महिला पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील कल्याण ज्वेलर्सच्या स्टोअरमधून सोन्याची बांगडी खरेदी करण्याच्या बहाण्याने आल्या. त्यांनी स्टोअरमधील सेल्समनचे लक्ष विचलित करून संधी साधत १ लाख १० हजार रुपये किमतीची प्लेन सोन्याची बांगडी चोरून नेली. हा प्रकार रात्री दागिने मोजत असताना तेथील सेल्समनच्या लक्षात आला. त्यांनी सीसीटीव्हीची पाहणी केली असता बुरखाधारी महिला बांगडी घेऊन जात असल्याचे दिसून आले. त्यानंतर चंदनसिंग किशोरसिंग राठोड यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### नळाच्या पाण्यात आला जिवंत साप

**नेरळ :** नेरळ ग्रामपंचायतीमध्ये जलशुद्धीकरण केंद्र असलेली नळपाणी योजना असून, देखील गढूळ आणि दूषित पाणी येण्याचे प्रकार थांबत नाहीत. त्यात आता पाण्यात साप वाहून आल्याने नेरळ ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. नेरळमध्ये गेल्या ३० वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. त्यात नेरळ गावच्या काही अंतरावरून उल्हास नदी वाहत असून, गावाला चांगली नळपाणी योजना राबवली जात आहेत. त्यामुळे नेरळमधील स्वच्छ पाणी हेच नेरळ गावचे नागरीकरण वाढण्यास महत्त्वाची ठरली आहे. मात्र, सध्या याच नेरळ गावात राबवली जाणारी नेरळ ग्रामपंचायतीची नळपाणी योजना चर्चेचा विषय ठरली आहे. नेरळ गावात सप्टेंबर महिन्यात आलेले गढूळ पाण्याने नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार स्पष्ट झाला होता. त्यात आता चक्क नळाच्या पाण्यातून साप येऊ लागले आहेत. नेरळ गावातील सम्राट नगर भागातील अशोक जाधव यांच्या घरी नळाच्या पाण्यासोबत चक्क साप आला. जाधव यांच्या घरातील महिला पाणी भरत असताना साप पाहून गडबडल्या. अशोक जाधव यांनी लगेच पाण्यात फिरत असलेला सापाचा व्हिडिओ नेरळ ग्रामपंचायतीकडे दिली असता ग्रामपंचायतीने तत्काळ आपल्या कार्यालयातील प्लंबर तेथे पाठवले.



# स्मार्ट मीटरची महाराष्ट्रात सक्ती का?

## जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांचा सवाल

( पान १ वरुन)

शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत आणि राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग तालुक्यात स्मार्ट मीटरविरोधात आक्रमक भूमिका घेण्यात आली. अलिबाग तालुक्यातील सुरू झालेला हा मुद्दा जिल्हाभर घेण्याची चर्चा झाली. स्मार्ट मीटरच्या प्रश्नाबाबत जिल्हा चिटणीस मंडळाची विस्तारित बैठक नुकतीच पार पडली. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली. त्यानुसार जिल्ह्यामध्ये जनजागृती करण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून तालुकास्तरावर दौरा सुरू करण्यात आला.

या दौऱ्याच्या माध्यमातून होणाऱ्या बैठकांना नागरिकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. स्लार्ट मीटरला वेगवेगळ्या राज्यातून विरोध असताना देखील महाराष्ट्र राज्यात सक्तीने मीटर बसवण्याचा तगादा सरकार करत आहे. भांडवलदारांच्या फायद्यासाठी मीटरचा खर्च बिलांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या खिशातून काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्राहकांची मोठी पिळवणूक केली जात आहे. त्यामुळे गाव पातळीवर सर्व घटकाला या समस्येतून दूर करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने मोठा लढा सुरू केला. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत हा मुद्दा पटवून देण्याची गरज आहे.

सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी शेकापने भूमिका घेतली आहे. या लढ्याला व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुकास्तरावर मेळावे घेतले जाणार आहेत. पक्ष श्रेष्ठींच्या नेतृत्वाखाली हे मेळावे होणार आहेत. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाखाचा मोर्चा तिसऱ्या टप्प्यात होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने स्मार्ट मिटराविरोधात लढण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खरे यांनी केले.




### सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक : ॲड. गौतम पाटील



स्मार्ट मीटरमुळे येणाऱ्या वाढीव विद्युत बिलाचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका बसत आहे. सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे. स्मार्ट मीटर विरोधात शेतकरी कामगार पक्षाने सुरू केलेला लढा सर्व सामान्यांसाठी आशेचे किरण बनले आहे. लाखोच्या संख्येने अलिबागमध्ये मोठ्या आंदोलन होणार आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेकाप जिल्हा सहचिटणीस गौतम पाटील यांनी केले. सध्या एस.आय.आर.चे काम सुरू आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी काळजी घेऊन ही प्रक्रिया योग्य पद्धतीने व्हावी यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

### लढ्याला अलिबागमधून सुरुवात



नागरिकांना विश्वासात न घेता स्मार्ट मीटर लावण्याचा तगादा सुरु केला. त्यानंतर अवास्तव विज बिल येऊ लागले. अचानक वीज बिलामध्ये वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाला. तकारी वाढू लागल्या. शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या ही बाब लक्षात आली. अखेर सर्वसामान्यांच्या हितासाठी शेकापच्यावतीने अलिबागमध्ये स्मार्ट मीटरविरोधात लढा सुरू करण्यात आला. स्मार्ट मीटरची वात अलिबागमधून पेटली. स्मार्ट मीटरच्या नावाखाली पाय रोवणाऱ्या राक्षसाला रोखण्यासाठी आंदोलन सुरू केले. अदानीसारख्या धनदांडग्यांच्या फायद्यासाठी स्मार्ट मीटर आणून सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. भांडवलदारांच्या मदतीने सर्व गिळंकृत करण्याचा प्रयत्न होत आहे. ज्या जनतेने ज्यांना निवडून दिले, ते लोकप्रतिनिधी सत्तेत लोळून घेत आहेत. सत्तेचा माज दाखवून कोट्यवधींचे आर्थिक व्यवहार सुरू आहेत. गुजरातसह दक्षिण भारतात स्मार्ट मीटरला विरोध दर्शविण्यात आला. मग महाराष्ट्रात घरोघरी स्मार्ट मीटर बसवून सरकार आर्थिक पिळवणूक का करीत आहे? स्मार्ट मीटरवर नियंत्रण अदानीचे नियंत्रण आहे. खासगीकरणाचा घाट घातला जात आहे. भांडवलदारांची मंडळी येऊन जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवत आहेत. सरकारने हे वेळीच रोखणे गरजेचे आहे. अन्यथा शेकाप नेते जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन आगामी काळात केले जाईल, असा इशारा ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला.

### स्मार्ट मीटरमुळे जनता त्रस्त : सुरेश घरत

स्मार्ट मीटर हा सर्वात घातकी आणि सर्वसामान्यांशी निगडीत विषय आहे. शहरासह ग्रामीण भागातील जनतादेखील या स्मार्ट विरोधात आक्रमक झाली आहे. अलिबागपासून सुरु झालेला हा लढा आता जिल्हा पातळीवरून राज्य पातळीवर पोहचू लागला आहे. आगामी काळात शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने स्मार्ट मीटर विरोधात मोठा मोर्चा काढला जाणार आहे. या मोर्चात अलिबागमधून २५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार आहेत, असा विश्वास शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात अलिबागसह रायगड जिल्ह्यातून कार्यकर्त्यांन मोठ्या संख्येने उपस्थित राहवे, असे आवाहन केले.

# स्मार्ट मीटरच्या विरोधात पालीत एल्गार



- शेकापच्या तालुकानिहाय दौऱ्याला सुरूवात
- सुरेश खैरे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा रायगड जिल्हा तालुकानिहाय दौरा मंगळवारी (दि.६) सुधागड-पाली येथून सुरू झाला. यावेळी स्मार्ट मीटर विरोधी मोर्चा, मतदार यादी पुनरिक्षण आणि पक्ष संघटना या विषयांवर जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पाली येथील निवासस्थानी गाठीभेटी सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, या कर्जबाजारी महाराष्ट्राने २ हजाराचा स्मार्ट मीटर १२ हजार रुपयाला विकत घेतला आहे. तसेच, या मिटरमुळे महावितरणमधील २५ हजार तरुणांच्या नोकऱ्या जाणार आहेत. त्यामुळे हा लढा आम्ही तीन टप्प्यात लढणार आहोत. तसेच, दुसरा विषय मतदार नोंदणीचा असून, काही मतदार जाणिवपूर्वक वगळले जात आहेत. २००४ ला नाव होते, पण आता पुरावा नाही म्हणून नोटिसा बजावल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर जिल्हा चिटणीस सुरेश खैरे म्हणाले, एक महिन्यापूर्वी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या उपस्थितीत स्मार्टमीटर बाबत बैठक पार पडली. या बैठकीत "वीज बिल भरमसाठ येत असून, स्मार्ट मीटरची सक्ती केली जात आहे," असा विषय मांडला गेला. गावोगावी अदानीची मंडळी सक्तीने मीटर बदलत आहेत. तसेच, या स्मार्ट मीटरमुळे आधी ३००-५०० येणारे बिल आता १५०० ते ३००० येत आहे. भाजपशासित इतर राज्यांनी विरोध करून हे टेंडर पास होऊ दिले नाही, मात्र महाराष्ट्रात १२ हजार रुपये प्रती मीटरप्रमाणे कोट्यवधींचे टेंडर अदानीला दिले. प्रत्यक्षात १५०० रुपयांच्या मीटरसाठी १२ हजार मोजले जात आहेत. ६० टक्के अनुदान केंद्र तर ४० टक्के कर्ज राज्य सरकार घेऊन अदानीला देणार असून, ते कर्ज जनतेच्या बिलातून वसूल केले जाणार आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात आम्ही तालुकानिहाय बैठका घेत आहोत. दुसऱ्या टप्प्यात शेकाप सरचिटणीस जयंत पाटील व माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या सभा आणि तिसऱ्या टप्प्यात अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाखांचा मोर्चा काढणार आहोत, असेही खैरे म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य कामगार आघाडीचे प्रदीप नाईक, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, अलिबाग महिला आघाडी अध्यक्ष हेमाडे, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य किसनराव उमटे, तालुका चिटणीस अतिश सागळे, तालुका सहचिटणीस प्रवीण कुंभार, महेश जाधव, जनार्दन जोशी, सुधीर साखरले, महिला आघाडीच्या समृद्धी यादव, माजी सभापती शेळके, विविध पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबागमध्ये रक्तदान शिबीर




### अक्षया नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ अलिबाग, अलिबाग नगरपरिषद, लायन्स क्लब अलिबाग डायमंड, लायन्स क्लब अलिबाग-मांडवा, आगरी सामाजिक संस्था आणि कच्छी भवन ट्रस्टच्यावतीने 'ऑक्टोबर सेवा सप्ताहा'निमित्त अलिबागमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रांतपाल प्रवीण सरनाईक यांच्या हस्ते शिबिराचा शुभारंभ झाला. यावेळी अलिबाग नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

रक्तदान हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून गरजू रुग्णांना जीवनदान देणारे सेवाकार्य आहे. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीतील माता तसेच विविध आजारांवरील उपचारादरम्यान रक्ताची आवश्यकता असलेल्या रुग्णांसाठी रक्ताचा साठा उपलब्ध राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही गरज लक्षात घेऊन लायन्स इंटरनॅशनलच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य देण्यात आले आहे. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी रक्तदान करून आपले कर्तव्य बजावले. तसेच, या रक्तदान शिबिरामध्ये सुमारे ५० बॉटल रक्त जमा करण्यात आले. यावेळी माजी प्रांतपाल सुभाष भालवाल, जीएसटी समन्वयक अनिल म्हात्रे, झोन चेअरमन प्रदीप नाईक, श्रीकांत ओसवाल, अलिबाग नगरपरिषदेच्या उपसभापती अश्विनी ठोसर, आगरी सामाजिक संस्थेचे निलेश पाटील, लायन्स क्लबचे मान्यवर व पदाधिकारी, नगरपरिषदेचे पदाधिकारी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# 'शेतकऱ्यांच्या अन्य समस्या मार्गी लावा'

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दुष्काळासह शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अन्य गंभीर समस्यांवर चर्चा करण्यासाठी जिल्ह्यातील प्रगतशील सन्मानार्थी शेतकऱ्यांची महत्वपूर्ण बैठक लवकरात लवकर बोलविण्यात यावी. याकरिता रायगड जिल्ह्यातील प्रगतशील सन्मानार्थी शेतकऱ्यांच्यावतीने जिल्हाधिकारी किशन जावळे यांना सोमवारी (दि.५) लेखी निवेदन देण्यात आले आहे. याप्रसंगी प्रफुल्ल खारपाटील यांच्यासह जिल्ह्यातील अन्य प्रगतशील सन्मानार्थी शेतकरी उपस्थित होते.

या निवेदनात यंदा उशिरा पडलेल्या आणि ऐन हंगामात गायब झालेल्या पावसाचा मोठा फटका जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भात पिकांना बसला आहे. जिल्ह्यातील भातशेती सध्या हिरवीगार तर काही ठिकाणी पिवळी पडली असून, जमिनीला भेगा पडल्यामुळे भातपिके संकटात आली आहेत. त्यामुळे भातशेती बहरण्याची शक्यता कमी आहे. खरीप हंगामातील भातपिकासह जिल्ह्यातील वरी, नाचणी तसेच अन्यपिके संकटात सापडली असून, यंदा कमी पावसाच्या अभावी जमिनीची भूजल पातळीही धोक्यात आली असून, त्याचा परिणाम पुढील रब्बीपिकांवर होणार असल्याचेही निवेदनात स्पष्ट म्हटले आहे. याखेरीज भातपीक विमा, आंबापिक विमा यासह शासकीय योजनांतील त्रुटी व शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अन्य समस्या निवेदनात मांडल्या आहेत. या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी शेतकऱ्यांची लवकरात लवकर बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# डॉ. अनिकेत देशमुख यांची आंदोलनस्थळी भेट

## विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी आवाज उठविण्याची ग्वाही

**। पुणे । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला शेकापचे युवा नेते डॉ. अनिकेत देशमुख यांनी मंगळवारी (दि.६) प्रत्यक्ष भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या मागण्या, त्यांच्या अडचणी तसेच आंदोलनामागील भूमिका जाणून घेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका स्पष्ट केली.

आमदार रोहित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या संघर्षात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळणे आणि त्यांच्या मागण्यांवर शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे डॉ. देशमुख यांनी यावेळी सांगितले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य त्यांच्या




मेहनतीशी आणि उपलब्ध संधींशी जोडलेले आहे. त्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे केवळ आंदोलन म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्न म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी अनेक वर्षे सातत्याने अभ्यास, मेहनत आणि आर्थिक खर्च करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करत असतात. परीक्षेतील बदल, प्रक्रिया किंवा निर्णयांचा थेट परिणाम त्यांच्या तयारीवर आणि भविष्यातील संधींवर होत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन संवादातून मार्ग काढावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली." विद्यार्थ्यांचा हा संघर्ष केवळ एका मागणीपुरता मर्यादित नसून, त्यांच्या भविष्याचा संघर्ष आहे. मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शेकाप पक्ष विद्यार्थ्यांच्या सोबत असून, त्यांच्या प्रश्नांसाठी आवश्यक त्या पातळीवर आवाज उठविला जाईल," अशी भूमिका डॉ. अनिकेत देशमुख यांनी व्यक्त केली. आंदोलनस्थळी उपस्थित विद्यार्थ्यांनीही आपल्या विविध मागण्या आणि समस्या डॉ. देशमुख यांच्यासमोर मांडल्या. विद्यार्थ्यांच्या भावना आणि मागण्यांची दखल घेत त्यांच्या प्रश्नांवर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

**सेवा कुचकामी ठरल्याने संतापाची लाट | मच्छीमारांचे सव्वा लाख रुपये पाण्यात?**

# सॅटेलाइट फोनची सेवा अद्याप बंदच

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी आपात्कालीन परिस्थितीत त्वरित संपर्क साधून बचाव करण्यासाठी मच्छीमारांना लाखो रुपये किंमतीचे सॅटेलाइट फोनचे वाटप करण्यात केले होते. परंतु, दोन महिने उलटून गेल्यानंतरही ही सेवा अद्यापही सुरू झालेली नाही. त्यामुळे सरकारची सॅटेलाइट फोनची सेवा कुचकामी ठरल्याने मच्छीमारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राज्यातील मच्छीमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदत मिळावी आणि हवामान तसेच सुरक्षा सूचना वेळेवर प्राप्त व्हाव्यात, यासाठी महाराष्ट्र सरकारने सॅटेलाइट फोन योजना आणली आहे. राज्याच्या मच्छीमारांसाठी "सुरक्षा प्रथम" या धोरणानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने बीएसएनएल अधिकाऱ्यांशी सेवा देण्याबाबत चर्चा करूनच बीएसएनएल ग्लोबल सॅटेलाईट फोन सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले होते. त्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर काही मच्छीमारांना जुलै महिन्यात सॅटेलाईट फोनचे वाटपही करण्यात आले होते. त्यावेळी आपात्कालीन सॅटेलाईट फोनची सेवा दि.१६ सप्टेंबरपासून कार्यान्वित होणार असल्याचेही मंत्र्यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर मच्छीमारांनी सव्वालाख रुपये किंमत असलेली सॅटेलाईट फोन सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी कर्ज, उधारी, उसनवार करीत खरेदी केली. तसेच, मासिक ६ हजार रुपये खर्च करून रिचार्ज देखील मारला. मात्र, मच्छीमारांचे प्राण आणि उपजीविका सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने मोठा गाजावाजा करून सर्वोच्च प्राथमिकता देणारी मच्छीमारांसाठी जीवनदायी सॅटेलाईट फोन सेवाच सुरूच झालेली नाही. त्यामुळे मच्छीमारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



> खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी आपात्कालीन परिस्थितीत बचावासाठी सुरू करण्यात आलेली सॅटेलाईट फोन सेवा कार्यान्वित झालेली नाही. याची माहिती घेतली जात आहे.
>
> - महेश देवरे, सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग

### जिल्ह्यातील २५ मच्छीमारांचा समावेश

मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी आपात्कालीन परिस्थितीत त्वरित संपर्क साधून बचाव करण्यासाठी मच्छीमारांना सव्वालाख रुपये किंमतीचे सॅटेलाइट फोनचे वाटप करण्यात केले होते. त्यात रायगड जिल्ह्यातील एकूण २५ मच्छीमारांचा समावेश आहे. त्यापैकी १० ते १२ करंजा-उरण येथील मच्छीमारही असल्याची माहिती संबंधित मच्छीमारांनी दिली आहे. मात्र, मागील दोन महिन्यांनंतरही सॅटेलाईट फोन सेवा सुरूच झाली नसल्याची माहिती करंजा येथील मच्छीमार रोहन नाखवा यांनी दिली आहे.

### फसवणूक करणारा तरुण ताब्यात

**नवीन पनवेल :** पनवेल येथील ओम गणेश ज्वेलर्स दुकानात ३४ हजार रुपयांची स्कॅनर द्वारे फसवणूक करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. राहुल करपे असे त्याचे नाव आहे. त्याने पनवेल येथील झवेरी बाजारातील ओम गणेश ज्वेलर्समध्ये सोन्याची चैन ९७ हजार रुपयांत खरेदी केली आणि ६३ हजार रुपये रोख देऊन ३४ हजार रुपये गुगल पे द्वारे करतो असे सांगून दुकानातील स्कॅनर स्कॅन करून पेमेंट झाले असे सांगितले. मात्र, पेमेंट न करता ज्वेलर्सची फसवणूक करण्यात आली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी राहुल करपे याला ताब्यात घेतले.

# नरेंद्र मोदींची पंचविशी

राज्यप्रमुख म्हणून नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला पंचवीस वर्षे झाली आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सात ऑक्टोबर २००१ला त्यांनी शपथ घेतली. त्यानंतर २०१४मध्ये दिल्लीत पंतप्रधान झाले. चरणसिंग, व्हीपी सिंग, देवेगौडा असे काही अपवाद वगळता मुख्यमंत्र्यांचे पंतप्रधान झालेले नेते आपल्याकडे कमी आहेत. या तिघांचा काळ सर्वात अल्प राहिला आहे. उलट मोदी आता सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेल्या पंडित नेहरु व इंदिरा गांधींच्या कारकीर्दीसोबत स्पर्धा करीत आहेत. मोदी व त्यांचा भाजप यांच्यासाठी ही अभिमानाची बाब आहे यात शंका नाही. एरवी, याबाबत देशानेही आनंद व्यक्त केला असता. पण मोदींचे हे यश अनेक काळ्या गोष्टींनी झाकोळले गेले आहे. एकीकडे पंचविशी साजरी होत असताना दुसरीकडे निवडणूक आयोगामार्फत लोकशाहीचा खून झाल्याविरोधात विरोधकांचे आंदोलन सुरू असावे ही गोष्ट म्हणजे मोदींच्या कारकीर्दीवरची मार्मिक टिपण्णी आहे. निवडणूक आयोगाने मतदार तपासणीच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाशी मोदींचा संबंध नाही असा एक तांत्रिक बचाव नक्कीच करता येईल. पण तो किती खोटा आहे हे भाजप प्रवक्त्यांच्या रोजच्या प्रतिक्रियांवरून दिसते आहे. आयोगावर जे जे आरोप होत आहेत त्यांचे उत्तर आयोगाकडून येण्याआधी भाजपकडून येत आहे. शिवाय यातही उत्तर देण्याऐवजी काँग्रेसला अराजक माजवायचे आहे अशी आदळआपट जास्त असते. ज्ञानेशकुमार यांनी बंगाल, बिहारमध्ये लाखो मतदार वगळले जातील अशा पद्धतीने मतदार तपासणी राबवली. बंगालमध्ये जवळपास २७ लाख मतदारांना मतदान करता आले नाही. सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश उज्वल भूयान यांनीच या गोष्टीवर कोरडे ओढले आहेत. देशातल्या देशात मतदान करू शकणारे आणि मतदानाचा अधिकार काढून घेतलेले असे दोन प्रकारचे नागरिक असू शकत नाहीत, हे घटनाविरोधी आहे असे स्पष्ट मत भूयान यांनी नोंदवले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रोहिंग्टन मिस्त्री यांनीही याबाबत थेट टीका केली असून भाजपला जिंकवण्यासाठी आणि तृणमूल काँग्रेसला हरवण्यासाठी हा प्रकार झाल्याचे म्हटले आहे. मोदी व भाजपचा संबंध इथे येतो. निवडणूक आयोगाने हे सर्व भाजपला जिंकवण्यासाठी केले असा विरोधकांचा आरोप असून आता न्यायाधीश राहिलेले ज्येष्ठ कायदेतज्ज्ञही तसेच म्हणू लागले आहेत. हा अत्यंत गंभीर आरोप आहे.

## मौनी पंतप्रधान

या स्थितीत भाजपने व मोदींनी अत्यंत जबाबदारीने याबाबत खुलासा करणे आवश्यक होते. आयोगाच्या निर्णयांची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्याची तयारी ते दाखवू शकले असते. पण मोदी तर अशा प्रसंगी चकार शब्दही काढत नाहीत हा नेहमीचा अनुभव आहे. शेतकऱ्यांनी दोन वर्षे आंदोलन केले तर मोदी एकही शब्द बोलले नव्हते किंवा त्यांना चर्चेला बोलावण्याची लोकशाहीतील सभ्यता त्यांना दाखवता आली नव्हती. मणिपूरमध्ये प्रचंड हिंसाचार झाला व राज्यात दोन समुदायात यादवी माजली. तरीही मोदी गप्प राहिले. दुनियाभरचे दौरे त्यांनी केले. पण मणिपूरला गेले नाहीत. मोदी यांच्या २५ वर्षांमध्ये सर्वच काही वाईट झाले असे म्हणता येणार नाही. पण विरोध सहन न करू शकणे, विरोधकांना पूर्ण संपवण्यासाठी पोलिस, इडी, सोशल मिडिया अशा माध्यमातून छळ करणे हे त्यांच्या राजवटीचे वैशिष्ट्य हे अधिक ठळक जाणवणारे आहे. गुजरातमध्ये गोधरा दंगलीनंतर त्यांनी मुस्लिम इलाख्यांना भेट देण्याचे टाळले होते. पत्रकार परिषदा घेणे त्यांनी तेव्हापासूनच बंद केले. संसदेत येण्याचे ते टाळतात. सर्वपक्षीय बैठकीत ते एकदाही सहभागी झालेले नाहीत. आपण सर्वांच्या वर आहोत असा ताठा यातून त्यांना दाखवून द्यायचा असतो. चीनच्या आक्रमणाबाबत एकही प्रश्न संसदेत विचारला जाणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली आहे. खुद्द मोदी कधीही त्याबाबत बोलत नाहीत. ३७१ कलम रद्द करताना काश्मीरला लवकरच पुन्हा पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल असे आश्वासन दिले होते. ते आजतागायत पाळले गेले नाही. उलट अलिकडे काश्मीर विधानसभेत मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी असा ठराव केला असता त्यांना भाजपने देशद्रोही ठरवले. दिल्ली दंगलीतील आरोपी असोत की भीमा कोरेगावचे आरोपी, त्यांना कोणत्याही खटल्याविना अनेक वर्षे तुरुंगात सडवत ठेवण्यात आले. गुजरात दंगलींबाबत स्पष्ट भूमिका घेणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना वेचून वेचून शिक्षा करण्यात आल्या. हा मोदींच्या २५ वर्षांच्या कारकीर्दीचा ठळक ताळेबंद आहे.

## कुठे गेले संघाचे संस्कार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव गोळवलकर यांचा विचारधन हा ग्रंथ संघ परिवार व भाजपसाठी फार आदर्श आहे. या ग्रंथात गोळवलकरांनी तत्कालीन काँग्रेसच्या भ्रष्टाचारी वर्तनावर टीका केली आहे. पक्षांची फोडाफोडी, लाचलुचपत इत्यादींवर कोरडे ओढले आहेत. संघाला चारित्र्यसंपन्न कार्यकर्ते घडवायचे आहेत हे त्यांचे मुख्य सूत्र होते. अशी प्रेरणा घेऊन तयार झालेले उत्तम चारित्र्याचे कार्यकर्ते देशात परिवर्तन घडवतील असे त्यांचे स्वप्न होते. नरेंद्र मोदी हे संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते. नंतर ते भाजपमध्ये आले. पण मोदींचा गेल्या अकरा वर्षांचा केंद्रातला कारभार हा गोळवलकरांच्या स्वप्नातील आदर्श संघ कार्यकर्त्याला शोभणारा आहे काय याचे उत्तर संघाच्या लोकांनीच द्यायला हवे. खुद्द मोदी तर आता स्वतःला बहुदा संघाच्याही वर मानत असावेत. ते क्वचितच मोहन भागवत यांना भेटतात. लोकशाही परंपरेनुसार त्यांनी राष्ट्रपतींची नियमित भेट घेणे हेही आवश्यक असते. तेही ते किती करतात याबाबत शंका आहेत. ते संसदेतही खूप कमी काळ उपस्थित असतात. पंडित नेहरु किंवा इंदिरा गांधी प्रश्नोत्तराच्या तासाला हजर राहत, प्रश्नांची उत्तरे देत किंवा निवेदने करीत. मोदी केवळ भाषणे ठोकण्यासाठी तेथे येतात. मुद्दा असा की, ज्या संघाच्या विचारसरणीतून ते घडले तिथली नैतिकता त्यांनी पाळलेली नाही. आणि लोकशाहीतील नीतीनियम, संकेतही त्यांनी धुडकावून लावले आहेत. भ्रष्टाचारी म्हणून ज्यांच्यावर टीका केली त्यांना दुसऱ्या दिवशी पक्षात घेणे, गुंडपुंडांना मोकळे रान देणे, विरोधक महिलांवर वाट्टेल तशी टीका होऊ देणे, गौरक्षा किंवा धर्मश्रध्देच्या नावाखाली केलेल्या हिंसाचाराकडे काणाडोळा करणे अशा गोष्टी त्यांच्या राजवटीत रोज घडत असतात. गेल्या चौदा वर्षात देशाची आर्थिक प्रगती झाली आहे. पण मोदी नसते तरीही ती झालीच असती. अगदी देवेगौडा किंवा इंदरकुमार गुजराल यांच्या अस्थिर सरकारांच्या काळातही ती झालीच होती. प्रत्यक्षात मोदींनी सुरु केलेले मेक इन इंडिया, स्मार्ट सिटी वगैरे प्रकल्प अपयशी झाले आहेत. उलट अदानीसारख्या एकाच भांडवलदारावर संधींचा जो काही वर्षाव चालू आहे तो अभूतपूर्व आहे. गोळवलकर, देवरस यांना हा सर्व कारभार पाहून काय वाटले असते याचा संघ व भाजपच्या लोकांनी विचार करायला हवा. मात्र मोदींच्या काळात असा विचार करणे यालाच बंदी आहे. मोदी हे आजचे निर्विवाद लोकप्रिय नेते आहेत. पण लोकशाही राष्ट्राचे नेते म्हणून आपल्यावर असलेल्या जबाबदारीला त्यांनी न्याय दिला आहे काय याचा विचार त्यांनी व त्यांच्या समर्थकांनी करण्याची वेळ आली आहे.

---

**विचार**

# व्यापारमैत्री आणि नियमांना कात्री

***चीनशी सीमेवर शत्रुत्व असले तरी व्यापारात चांगलेच मित्रत्व असल्याचे चित्र अलिकडच्या काळात पहायला मिळाले. दुसरीकडे क्रिएटरच्या मृत्युपश्चात डिजिटल कमाई कोणाकडे जाणार याविषयीच्या नियमांचा उलगडा समोर आला. तिसरी महत्वाची बातमी होती 'नेस्ले इंडिया'वरील 'एफएसएसएआय'च्या कारवाईची. दरम्यान, मुलांच्या पासपोर्ट नियमांमध्ये महत्वाचे बदल झाल्याचेही पहायला मिळाले.***




**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये चीनशी होणाऱ्या व्यापारापासून लहान मुलांच्या पासपोर्टपर्यंत बदललेल्या नियमांविषयी लक्षवेधी बातम्या पहायला मिळाल्या. चीनशी सीमेवर शत्रुत्व असले तरी व्यापारात चांगलेच मित्रत्व असल्याचे चित्र पहायला मिळाले. दुसरीकडे क्रिएटरच्या मृत्युपश्चात डिजिटल कमाई कोणाकडे जाणार याविषयीच्या नियमांचा उलगडा समोर आला. तिसरी महत्वाची बातमी होती 'नेस्ले इंडिया'वरील 'एफएसएसएआय'च्या कारवाईची. सरतेशेवटी मुलांच्या पासपोर्ट नियमांमध्ये महत्वाचे बदल झाल्याचेही पहायला मिळाले.

भारताच्या बाणिज्य मंत्रालयाने अलीकडेच जाहीर केलेल्या नवीन आकडेवारीने देशाच्या व्यावसायिक जगतात मोठी खळबळ उडवून दिली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या पाच महिन्यांच्या कालावधीत म्हणजेच १ एप्रिल ते ३१ ऑगस्टदरम्यान भारताने चीनकडून विक्रमी प्रमाणावर मालाची खरेदी केली आहे. या पाच महिन्यांच्या काळात चीनमधून होणारी आयात वाढून तब्बल सहा लाख २८ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही आयात सुमारे चार लाख ९४ हजार कोटी रुपये इतकी होती. चीनसोबतच्या सीमाभागात तणावाचे वातावरण असताना आणि राजकीय स्तरावर अनेक मतभेद सुरू असतानादेखील व्यावसायिक पातळीवर ड्रॅगन हा आपला सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला असल्याचे या ताज्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

या यादीमध्ये चीनपाठोपाठ रशिया दुसऱ्या क्रमांकावर असून भारताने रशियाकडून सुमारे तीन लाख ९७ हजार कोटी रुपये किमतीचा माल मागवला आहे. याशिवाय महासत्ता असलेल्या अमेरिकेकडून सुमारे दोन लाख ६९ हजार कोटी रुपयांचा माल खरेदी करण्यात आला आहे. एवढेच नव्हे, तर संयुक्त अरब अमिरातीकडून दोन लाख ३१ हजार कोटी रुपये, दक्षिण कोरियाकडून एक लाख १६ हजार कोटी रुपये आणि सौदी अरेबियाकडून एक लाख १३ हजार कोटी रुपयांच्या वस्तूंची आयात करण्यात आली आहे. या प्रमुख देशांव्यतिरिक्त सिंगापूर, जपान, हाँगकाँग आणि जर्मनीसारख्या बलाढ्य देशांकडूनही भारताने मोठ्या प्रमाणावर मालाची आयात केली आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत परदेशी वस्तूंचा ओघ सातत्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भारताकडून होणाऱ्या निर्यातीच्या आघाडीवर अमेरिकेने आपले पहिले स्थान मजबूत राखले आहे. गेल्या पाच महिन्यांमध्ये भारताने अमेरिकेला सुमारे ४ लाख १२ हजार कोटी रुपये किमतीच्या मालाची विक्री केली आहे. न तसेच संयुक्त अरब अमिरातीला एक लाख ३० हजार कोटी रुपये, चीनला ९२ हजार कोटी रुपये आणि सिंगापूरला ९१ हजार कोटी रुपयांचा माल पाठवण्यात आला आहे. वाणिज्य मंत्रालयाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, केवळ ऑगस्ट महिन्यात भारताच्या एकूण निर्यातीमध्ये २५ टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून यात वस्तूंच्या निर्यातीत २६ टक्क्यांहून अधिक तर सेवा क्षेत्राच्या निर्यातीत २४ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. ही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक अत्यंत सकारात्मक बाब आहे.

दरम्यान, डिजीटल जगताशी संबंधित काही लक्षवेधी अर्थमाहिती समोर आली. आजच्या युगात सोशल मीडिया हे अनेकांसाठी रोजगाराचे आणि उत्पन्नाचे एक प्रमुख माध्यम बनले आहे. यूट्यूब आणि इन्स्टाग्राम सारख्या मंचांवर उत्कृष्ट आशय निर्माण करून अनेक डिजिटल निर्माते दरमहा लाखो रुपयांची कमाई करत असतात. परंतु, एखाद्या डिजिटल निर्मात्याचा अचानक मृत्यू झाला, तर त्याच्या खात्याचे मूळ संकेतशब्द किंवा पासवर्ड केवळ कौटुंबिक नातेसंबंधाच्या आधारे त्यांच्या नातेवाईकांना परस्पर दिले जात नाहीत. प्रत्येक कंपनीचे स्वतःचे गोपनीयता नियम असून त्यानुसारच पुढील कार्यवाही पार पडते. यूट्यूब हे गुगल खात्याशी जोडलेले असल्याने मृत्यूनंतर नातेवाईक योग्य ते कायदेशीर दस्तावेज सादर करून खाते बंद करण्याचा किंवा काही ठराविक माहिती मिळवण्याचा अर्ज करू शकतात. परंतु, संपूर्ण खात्याचे नियंत्रण किंवा थेट पासवर्ड कुटुंबाला मिळत नाही. दुसरीकडे, इंस्टाग्रामवर खाते कायमस्वरूपी बंद करणे अथवा आठवण म्हणून जतन करून ठेवणे असे दोन पर्याय उपलब्ध असतात. डिजिटल माध्यमातून होणाऱ्या आर्थिक कमाईचा विचार करता, यूट्यूबवरून होणारे उत्पन्न जोडलेल्या बँक खात्यात जमा होऊ शकते. बँकेतील नामनिर्देशित व्यक्तीकडे ही रक्कम सोपवली जात असली, तरी अंतिम कायदेशीर वारसदारच त्या संपत्तीचा मुख्य मालक असतो. आजच्या काळात प्रत्येक डिजिटल निर्मात्याने आपल्या ऑनलाइन संपत्तीचे आणि कमाईचे योग्य नियोजन आधीच करून ठेवणे अत्यंत गरजेचे बनले आहे. आता एक खास बातमी. लहान मुलांच्या आरोग्याशी जोडलेल्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि जाहिरातींमधील दाव्यांबाबत भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. प्रसिद्ध अन्न पुरवठादार कंपनी 'नेस्ले इंडिया'च्या बाल आहाराशी संबंधित काही उत्पादनांची आणि ऑनलाइन मंचांवर केलेल्या जाहिरातींची सखोल तपासणी केल्यानंतर प्राधिकरणाने कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. लहान मुलांच्या आहाराची विक्री किंवा लोकप्रियता वाढवण्यासाठी उत्पादनांच्या पाकिटांवर आणि प्रचारसाहित्यात दिशाभूल करणारे दावे करण्यास कायद्याने बंदी आहे. या पार्श्वभूमीवर अन्नसुरक्षा प्राधिकरणाने 'नेस्ले इंडिया'विरोधात तीन वेगवेगळे कायदेशीर खटले दाखल केले असून, यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगात मोठी खळबळ उडाली. प्राधिकरणाने केलेल्या चौकशीमध्ये 'नेस्ले'च्या नॅन एक्सेल प्रो स्टेज १ आणि लॅक्टोजेन प्रो १ या उत्पादनांवर केलेल्या दाव्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

कंपनीने लॅक्टोजेनच्या वेष्टनावर 'व्हे प्रोटीन' पचायला अतिशय सोपे असल्याचा दावा केला होता. त्यावर प्राधिकरणाने तीव्र आक्षेप घेतला आहे. नियमांनुसार शिशू आहाराच्या विक्रीला प्रोत्साहन देणाऱ्या अशा दाव्यांना स्पष्ट मनाई आहे. याशिवाय कंपनीच्या आणखी एका फॉलो-अप फॉर्म्युला उत्पादनाची प्रयोगशाळेत चाचणी केली असता लहान मुलांच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या बायोटिन या पोषक घटकाचे प्रमाण ठरवून दिलेल्या मानकांनुसार आढळले नाही. दुसऱ्यांदा केलेल्या पुनर्तपासणीतही या घटकाची कमतरता स्पष्टपणे दिसून आली. या सर्व गंभीर त्रुटींमुळे आणि नियमांच्या उल्लंघनामुळे अन्न सुरक्षा प्राधिकरणाने 'नेस्ले इंडिया'विरोधात कायदेशीर प्रक्रियेचा बडगा उगारला. या कारवाईमुळे केवळ एकाच कंपनीला नव्हे, तर देशातील सर्वच खाद्यपदार्थ उत्पादक कंपन्यांना अन्न सुरक्षेचे नियम तंतोतंत पाळण्याचा एक कडक संदेश मिळाला आहे.

आणखी एक महत्वाची वार्ता म्हणजे परराष्ट्र मंत्रालयाने लहान मुलांच्या पासपोर्टच्या वैद्यतेबाबत एका अत्यंत महत्त्वाच्या नियमात मोठा बदल केला आहे. नवीन सुधारित नियमांनुसार, आता १५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांसाठी जारी करण्यात आलेला ३६ पानांचा सर्वसाधारण पासपोर्ट हा त्याच्या निर्मितीच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षे किंवा मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत, (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) वैध असणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या पासपोर्ट दुरुस्ती नियम, २०२६ ची अधिकृत सूचना राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. या नव्या निर्णयामुळे पालकांमध्ये वयाच्या मर्यादेबाबत असणारा मोठा गोंधळ दूर होणार आहे. पूर्वीच्या नियमांनुसार १५ वर्षांखालील मुलांचा पासपोर्ट ५ वर्षे किंवा मुलाचे वय १५ वर्षे पूर्ण होईपर्यंतच वैध मानला जात होता. आता ही वयोमर्यादा १८ वर्षांपर्यंत वाढवण्यात आली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाचा पासपोर्ट वयाच्या चौदाव्या वर्षी बनवला गेला असेल, तर पुढील चार वर्षांमध्ये मुलगा १८ वर्षांचा होताच जुन्या पासपोर्टची मुदत संपेल आणि नवीन पासपोर्ट काढावा लागेल. मात्र, दहाव्या वर्षी पासपोर्ट काढला असेल, तर पुढील पाच वर्षे म्हणजेच १५ व्या वर्षापर्यंतच वैध राहील. या नव्या वयोमर्यादेच्या सुटसुटीत नियमांमुळे बालकांच्या पासपोर्ट नूतकरणाची प्रक्रिया अधिक स्पष्ट झाली आहे. या नियमावलीसोबतच परराष्ट्र मंत्रालयाने पासपोर्ट अर्ज शुल्कातही सुधारणा केली आहे. १८ वर्षांखालील मुलांच्या ३६ पानांच्या सामान्य पासपोर्टसाठी आता एक हजार रुपयांऐवजी १७५० रुपये तर तत्काळ पासपोर्टसाठी तीन हजार रुपयांऐवजी ४२५० रुपये शुल्क द्यावे लागेल. तसेच १८ वर्षांवरील प्रौढांसाठी ३६ पानांच्या सामान्य पासपोर्टचे शुल्क १५०० रुपयांवरून २५०० रुपये आणि तत्काळ पासपोर्टचे शुल्क ३५०० वरून ५००० रुपये करण्यात आले आहे. याशिवाय ६० पानांच्या सामान्य पासपोर्टसाठी ३५०० रुपये तर 'तत्काळ' श्रेणीसाठी सहा हजार रुपये मोजावे लागतील.

---

**चर्चा आजची**

# पावसाअभावी भातशेती संकटात

**अंतरा पारंगे**

कोकणात खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जाते. तर कोकणातील भातशेती निसर्गावर अवलंबून आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून पावसाने दांडी मारल्याने भातशेती संकटात सापडली आहे. अनेक दिवस पाऊस न पडल्याने शेतातील जमीन सुकून ठिकठिकाणी भेगा पडल्या आहेत. सध्या भातपिकाला कणसे येण्याची प्रक्रिया सुरू असल्याने या कालावधीत पावसाची नितांत आवश्यकता असते. मात्र, त्याचवेळी कडक उन्हाचे चटके बसत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून, पाऊस कधी येईल या आशेने शेतकऱ्यांच्या डोळे आभाळाकडे लागले आहेत. दरम्यान, येत्या काही दिवसांत पावसाने अशीच पाठ फिरवली तर भातपिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागत आहे. यावर्षी पावसाचे आगमनही उशिराने झाले. परिणामी भातशेतीची लागवडही उशिरा करावी लागली. त्यानंतर जून महिन्यात पावसाने चांगलीच सुरुवात केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने भाताची लागवड करायला सुरुवात केली. मात्र जुलै महिन्यामध्ये एकाच महिन्यात झालेला पाऊस वगळता ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने पाठ फिरवली. भात पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पाण्याची गरज असताना पाऊस गायब झाल्याने शेतातील रोपे पिवळी पडून वाळू लागली आहेत. काही ठिकाणी तर भाताची पिके अक्षरशः करपली आहेत. तर शेतजमिनीला भेगा पडल्या आहेत.

यावर्षी प्रतिकूल परिस्थिती असूनही शेतकऱ्यांनी जोखीम पत्करून भातशेतीची लागवड केली. मात्र, आता लागवडीनंतर पिकाला पोषक असलेल्या कालावधीतच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर माठे संकट उभे राहिले आहे. भात पिकाला यंदा जेमतेम दीड महिनेच पाऊस मिळाल्याने लोंबी भरण्यात अडचण निर्माण झाली आहे. अशातच सध्या कडक ऊन पडत असून तापमानातही वाढ झाली आहे. बदलत्या हवामानाचा फटका सातत्याने शेतकऱ्यांना बसत असून, वर्षभर मेहनत करून उभे केलेल्या पिकावर पुन्हा संकट ओढवले आहे.



हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनतीवर वाया जाणार की काय, अशी खंत व्यक्त केली जात आहे.

गेले काही दिवस कडक ऊन पडत असून तापमानातही मोठया प्रमाणावर वाढ होताना दिसत आहे. सध्या भातपिकाला फुलोरा येण्याबरोबरच कणसे धरण्याची प्रक्रिया सुरू आहे. अशा अवस्थेत पिकाला पावसाची नितांत आवश्यकता असते. पाऊस न पडता असेच कडक ऊन कायम राहिल्यास कणसांतील दाणे पूर्णपणे भरून न आल्याने उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. मागील काही दिवसांत काही भागांत अधूनमधून पावसाचा शिडकावा झाला आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र, आणखी काही दिवस कडक ऊन कायम राहिल्यास भातपिकाला नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतीचे नकसान झाले हाते, आता यावर्षी पावसाने दडी मारल्याने शेतजमीन सुकत असून भातपीक धोक्यात आले आहे. दरवर्षी शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. पीक ऐन भरात असतानाच पावसाअभावी यंदाचा हंगाम हातातून जाण्याची चिन्हे आहेत. शेतात जर पीक पिकलेच नाही तर खायचं काय, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. ग्रामीण भागातील हजारो शेतकरी खरीप भात पिकावर अवलंबून आहेत. अनेक गावांमध्ये तसेच विभागांमध्ये भाडेतत्त्वावर शेती केली जाते. भातशेतीसाठी शेतकऱ्यांनी महागडी बियाणे, खते, मजुरी, कीटकनाशके तसेच इतर खर्चासाठी हजारो रुपये खर्च केले. मात्र पावसाने दगा दिल्याने हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची भीती आहे. हातात पीक नसताना कर्ज कसे फेडायचे, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांपुढे ठाकला आहे. प्रतिकुल परिस्थितीतही भातशेतीची लागवड केली जाते. भात पिकाला प्रत्येक टप्प्यांमध्ये पावसाची आवश्यकता असते. १२० ते १४० दिवसांमध्ये भातशेती पिकत असल्यामुळे या काळात सर्वाधिक पावसाची गरज भासत असते. पेरणी, लावणी आणि त्यानंतर रोपांना तग धरण्यासाठी आवश्यक पाऊस पडला.

परंतु, त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने लोंबी येण्यास मोठी अडचण निर्माण झाली आहे. जिल्हयात मोठ्या प्रमाणावर भात लागवड करण्यात आली आहे. मागील कित्येक दिवसांपासून पाऊस पडलेला नाही. पुढील पाच-सहा दिवसांत पाऊस न पडल्यास भात पिकाला दाणा भरण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे आगामी काळातील पाऊस शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसाठी आगामी काही दिवस निर्णायक ठरणार असून, पावसाने आणखी दडी मारल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

---

**लोकसंसद**

## सर्पहत्या का करू नये?

सध्या काही रिल्समध्ये काही तरुण मुले सापांशी खेळताना किंवा साप अंगावर घेऊन रिल्स बनवतात. काही वेळेला सापांच्या पाठीमागे धावत जाऊन सापाला वेगवेगळ्या प्रकारे खेळवतात आणि त्याला त्रास देतात. काही व्हिडिओमध्ये तर मोठे मोठे नाग मारल्याचे सुद्धा निदर्शनास आले. त्यामुळे सर्प हत्या करण्याचे महाभयंकर पाप असे लोक ओढवून घेतात. सर्प हत्या का करू नये याची ज्योतिष शास्त्रानुसार आणि पर्यावरणाचा विचार करून काही कारणे आहेत. ती जाणून घेऊया. भारतीय संस्कृती आणि शास्त्रांमध्ये साप किंवा नाग मारण्यास कडक मनाई करण्यात आली आहे. ज्योतिषशास्त्र आणि पुराणांनुसार, जाणूनबुजून किंवा चुकून सर्पहत्या केल्यास व्यक्तीला 'सर्प दोष' किंवा 'कालसर्प दोष' लागतो. हा दोष सात पिढ्यांपर्यंतचा मानला जातो, ज्यामुळे संतती प्राप्तीमध्ये अडथळे, कुटुंबात कलह किंवा प्रगती खुंटणे अशा समस्या उद्भवू शकतात. आपल्याकडे 'नागपंचमी' ला नागांची मनोभावे पूजा केली जाते. ज्या जीवाची आपण देवता म्हणून पूजा करतो, त्याला मारणे हे महापाप मानले गेले आहे. साप हे भगवान शिवशंकरांच्या गळ्यातील भूषण आहेत आणि भगवान विष्णू हे स्वतः 'शेषनागा'वर शयन करतात. त्यामुळे सापाला मारल्यास या देवतांचा अनादर होतो असे मानले जाते. हिंदू धर्मात नागांना पितरांचे प्रतीक किंवा रक्षक मानले जाते. नाग मारल्याने पितृदोषही निर्माण होतो. विज्ञानाच्या दृष्टीनेही सापांना मारणे पुष्कळ हानिकारक आहे. साप शेतातील पिकांची नासाडी करणाऱ्या उंदरांना खातात. जर साप मारले गेले, तर उंदरांची संख्या प्रचंड वाढेल आणि अन्नधान्याचे मोठे नुकसान होईल. म्हणून सापांना 'शेतकऱ्यांचे मित्र' असे म्हटले जाते. निसर्गाची अन्न साखळी टिकवून ठेवण्यासाठी साप अत्यंत महत्त्वाचे आहेत. ते पर्यावरण संतुलित ठेवतात.

**- सौ. आदिती अमित देखणे,**

---

**दिनविशेष**

# भारताचा मानबिंदू : भारतीय वायुदल

दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात भारतीय वायुदल दिन म्हणून साजरा केला जातो. ८ ऑक्टोबर १९३२ रोजी भारतीय वायुदलाची स्थापना झाली. त्यामुळे २०२६ मध्ये भारतीय वायुदल आपला ९४ वा वायुदल दिन साजरा करत आहे. देशाच्या आकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या भारतीय वायुदलाच्या शौर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा हा दिवस आहे. भारतीय वायुदलाची सुरुवात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि मोजक्या विमानांपासून झाली. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय वायुदलाने सातत्याने आधुनिकीकरण केले. विविध देशांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच आज भारत स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेनेही वेगाने वाटचाल करत आहे. तेजससारखे स्वदेशी लढाऊ विमान, सुखोई-३० एमकेआय, राफेल, मिराज-२००० यांसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने भारतीय वायुदलाच्या सामर्थ्यात भर घालत आहेत. आधुनिक रडार, क्षेपणास्त्र प्रणाली, हवाई इंधन भरण्याची क्षमता, उपग्रहाधारित दळणवळण, नेटवर्क-केंद्रित युद्धप्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञानामुळे वायुदलाची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय वायुदलाच्या शौर्याचा इतिहास गौरवशाली आहे. १९४७-४८, १९६५ आणि १९७१च्या युद्धांमध्ये वायुदलाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः १९७१च्या युद्धात भारतीय वायुदलाने प्रभावी हवाई कारवाया करत भारतीय सैन्याच्या प्रगतीला मोठी मदत केली. या पराक्रमामुळे भारतीय संरक्षण व्यवस्थेतील वायुदलाचे महत्त्व अधोरेखित झाले. १९९९चे कारगिल युद्ध भारतीय वायुदलाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे. या युद्धात भारतीय वायुदलाने 'ऑपरेशन सफेद सागर' अंतर्गत महत्त्वाची हवाई कारवाई केली. या मोहिमेने भारतीय वायुदलाच्या धैर्याबरोबरच त्याच्या अचूक नियोजनाची आणि युद्धकौशल्याची जगाला जाणीव करून दिली. पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी बालाकोट येथे एअर स्ट्राईक केला. भारतीय वायुदलाच्या मिराज-२००० विमानांनी पाकिस्तानातील बालाकोट परिसरातील दहशतवादी प्रशिक्षण तळांवर हवाई कारवाई केली. या कारवाईने दहशतवादाला भारताचे धोरणात्मक आणि लष्करी प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य जगासमोर दाखवून दिले. ऑपरेशन सिंदूरने भारतीय वायुदलाच्या आधुनिक युद्धक्षमता आणि संयुक्त लष्करी कारवाईतील महत्त्व अधोरेखित केले. दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सशस्त्र दलांनी लक्ष्यित आणि समन्वित कारवाई केली. या कारवाईत भारतीय वायुदलाने आधुनिक लढाऊ विमाने, अचूक शस्त्रप्रणाली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली क्षमता दाखवून दिली. भारतीय वायुदलाची ताकद केवळ लढाऊ विमानांमध्ये नाही. वैमानिक, तंत्रज्ञ, अभियंते, हवाई वाहतूक नियंत्रक, वैद्यकीय पथके आणि जमिनीवर अहोरात्र काम करणारे हजारो कर्मचारी हे त्याचे खरे सामर्थ्य आहेत. विमान आकाशात झेपावण्यापूर्वी त्यामागे असंख्य हातांचे कष्ट असतात. भारतीय वायुदलाचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात बचावकार्य, अन्न व औषधांची वाहतूक, दुर्गम भागात मदत पोहोचविणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे अशा मानवतावादी कार्यातही वायुदल नेहमीच आघाडीवर राहिले आहे. आजच्या काळात युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पारंपरिक लढाऊ विमानांबरोबरच ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर युद्ध, इलेक्ट्रॉनिक युद्ध, उपग्रह तंत्रज्ञान आणि मानवरहित युद्धप्रणाली यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे भारतीय वायुदलाला भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे लागणार आहे. त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादनाला अधिक चालना देणेही गरजेचे आहे. भारतीय वायुदल हा केवळ संरक्षण दलाचा एक भाग नाही, तर तो भारताच्या सामर्थ्याचा, आत्मविश्वासाचा आणि राष्ट्राभिमानाचा मानबिंदू आहे. भारताच्या नभांगणाचे रक्षण करणाऱ्या भारतीय वायुदलाला मनःपूर्वक अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# दुष्काळात शेतीला संजीवनी

## ■ प्रत्येक जिल्ह्याला नवीन एक हजार रोहित्र मंजूर

### ■ राज्य शासनाकडून अभूतपूर्व निर्णय

### ■ बळीराजाला दिलासा



। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी (दि.६) मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत.

यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष निधीच्या माध्यमातून तीन महत्वाचे कामे तातडीने करण्यात येणार आहेत. यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन वितरण रोहित्रांची खरेदी केली जाईल. त्याद्वारे अतिभारित किंवा नादुरुस्त रोहित्र बदलून सिंचनातील अडथळे दूर करण्यात येतील. यासोबतच कृषी वीजवाहिनीवर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना आणि शेतातील घरांना २४ तास सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार सिंगल फेज आणि थ्री-फेजचे नवीन 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' खरेदी करून ते बसवले जाणार आहेत. तसेच लांब अंतराच्या वीजवाहिन्यांवर कमी दाबाने वीजपुरवठा होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करून योग्य दाबाने व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँकेची खरेदी करण्यात येणार आहेत.

वीजयंत्रणेच्या या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी व्हावी, यासाठी महावितरणच्या संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयामार्फत सर्व तांत्रिक बाबींची तात्काळ तपासणी केली जाणार आहे. वीजयंत्रणेच्या स्थानिक गरजांनुसार आवश्यक अंदाजपत्रके तयार करून ती तत्परतेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान टळावे आणि पिकांना वेळेवर पाणी देता यावे, यासाठी या अंदाजपत्रकांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल.

राज्य शासनाच्या या धोरणात्मक निर्णयामुळे दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## दत्ताराम कापसे यांचे निधन

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील गोवे गावातील रहिवासी दत्ताराम महादेव कापसे यांचे शनिवारी (दि.३) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७७ वर्ष होते. अतिशय प्रेमळ व शांत स्वभावाने ते सर्वांना परिचित होते.



सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांसहित समस्त गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलागा, सून, भाऊ, पुतणे, नातवंडे व मोठा कापसे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.१२ ऑक्टोबर तर उत्तरकार्य विधी बुधवार दि.१४ ऑक्टोबर रोजी त्यांच्या गोवे येथील राहत्या निवासस्थांनी होणार आहेत.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ ऑक्टोबर
१) श्रीम.सुधा गजेंद्र दळी
मु.थळपेठ, अलिबाग
दि.८-१०-१९४४

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

**कै. श्रीमती चंद्रभागा दगडु काळे, स्मरणार्थ, चोंडी, अलिबाग**

**मिनाक्षी गजानन भोसेकर, स्मरणार्थ, नांदगाव**

**निवेद माणिक मानाजी, स्मरणार्थ, अलिबाग**

**कै. सूर्यकांत किशनराव तानावडे, स्मरणार्थ, अलिबाग**



**जगाबाई उत्तमराव कांबळे, ७ वा स्मृति दिन, अलिबाग**

## पान १ वरून

### 'साखर कारखाने १५ नोव्हेंबरपूर्वी सुरू करू नये'

हितासाठी साखर कारखान्यांचा गळीत हंगाम १५ नोव्हेंबरपूर्वी सुरू करू नये, असा स्पष्ट इशारा शेकापचे नेते तथा माजी आमदार संपतराव पवार-पाटील यांनी सरकारला दिला. शेतकरी संघटनांच्या बैठकीत ते बोलत होते. शेतकरी कामगार पक्षाच्या शहर कार्यालयात ही बैठक पार पडली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार न करता १५ ऑक्टोबरपासून ऊस गळीत हंगाम सुरू केल्यास उसाला अपेक्षित रिकव्हरी मिळणार नाही. त्याचा थेट फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे. त्यामुळे सरकारने हंगाम सुरू करण्याबाबत घाई करू नये, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. या प्रश्नांवर सर्व शेतकरी संघटनांनी एकत्रितपणे लढा दिल्याशिवाय शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडणार नाही. यंदाच्या हंगामातील उसाच्या पहिल्या उचलीचा निर्णय सर्व संघटनांचा एकत्रित मेळावा घेऊन करण्यात येईल, असे पवार-पाटील यांनी स्पष्ट केले. ऊस वजनकाट्यातील गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने स्वतःचे ऊस वजनकाटे उभारावेत, तसेच उसाची रिकव्हरी कारखान्याच्या ठिकाणीच तपासण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.बैठकीस जय शिवराय संघटना, जनता दल, शरद जोशी संघटना यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस बाबुराव कदम, कुमार जाधव, शिवाजी माने, वसंत पाटील, गिरीष फोंडे, ज्ञानदेव पाटील, भगवान पाटील, बाबासाहेब देवकर आदी उपस्थित होते.

### 'या साहेब! हॉल तिकीट दाखवतो'

आंदोलकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. हे आंदोलन विद्यार्थ्यांचे नसून राजकीय स्टंट असल्याची टीका करण्यात आली होती. तसेच आंदोलनात विद्यार्थ्यांपेक्षा राजकीय कार्यकर्त्यांची संख्या अधिक असल्याचा दावा करण्यात आला. या टीकेवर विवेकानंद पाटील यांनी आंदोलनस्थळी संताप व्यक्त केला.

आपण राजकीय कार्यकर्ता नसून एमपीएससीची तयारी करणारा विद्यार्थी असल्याचे दाखवून देण्यासाठी हॉल तिकिट दाखवतो असे म्हणत त्यांनी थेट आव्हान दिले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आंदोलन करणाऱ्यांना राजकीय ठरवण्याऐवजी त्यांच्या मागण्यांकडे सरकारने लक्ष द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

याशिवाय आंदोलनात विद्यार्थी कमी आणि राजकीय व्यक्ती अधिक असल्याच्या सरकारच्या भूमि केवरही पाटील यांनी भाष्य केले. सरकारने आंदोलनात २० टक्के विद्यार्थी असल्याचे मान्य केले, हीच आंदोलनात विद्यार्थी असल्याची एकप्रकारे कबुली असल्याचे त्यांनी म्हटले. हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा आणि त्यांच्या भवितव्याचा असून, आंदोलनाला राजकीय रंग देऊन मूळ प्रश्न बाजूला करण्याचा प्रयत्न करू नये, असा सूर पाटील यांच्या प्रतिक्रियेतून उमटला.

**अध्यक्षांचा नैतिक राजीनामा घ्या**

एमपीएससीच्या अध्यक्षांनी संविधानिक प्रक्रियेतून नव्हे, तर नैतिकतेच्या आधारावर स्वतःहून राजीनामा द्यावा, अशी आंदोलकांची भूमिका असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. येत्या दोन दिवसांत अध्यक्ष राजीनामा देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षांचा राजीनामा ही आंदोलन सुरू केल्यापासूनची प्रमुख मागणी असून, सरकारने ती मान्य करावीच लागेल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी तीन शिष्टमंडळे गेली होती. तिसरे शिष्टमंडळ बैठकीतून नाराज होऊन बाहेर आले. त्यानंतर रोहित पवार यांनी आंदोलन सुरू ठेवण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. आंदोलकांच्या बारा मागण्यांपैकी अकरा मागण्या मान्य झाल्या असल्या तरी अध्यक्षांच्या राजीनाम्याची प्रमुख मागणी अद्याप कायम असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### विद्यार्थी समाजकंटक नाहीत

विद्यार्थ्यांनी अनेक तास अभ्यास करून परीक्षेची तयारी केलेली असते. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेत काही गैरप्रकार झाल्याचा संशय निर्माण झाला आणि विद्यार्थ्यांना आपली बाजू मांडण्यासाठी योग्य संधी मिळाली नाही, तर त्यांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे, असेही न्यायालयाने नमूद केले. परीक्षा प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण करून भविष्यात मुक्त आणि निष्पक्ष परीक्षा होतील, याची खात्री देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने सांगितले.

सरकारने आंदोलनकर्त्यांविरोधात गुन्हे दाखल न करण्याची भूमिका घेतल्याबद्दल न्यायालयाने समाधान व्यक्त केले. हे आंदोलनकर्ते विद्यार्थी आहेत. ते समाजकंटक नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यावेळी न्यायालयाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही आंदोलन थांबवून पुन्हा शिक्षण आणि अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले. या प्रकरणाची न्यायालयाने दखल घेतली असून विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे लक्ष दिले जाईल. परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाय केले जातील, त्यामुळे विद्यार्थ्यांनी न्यायालयावर विश्वास ठेवावा, असे खंडपीठाने सांगितले.

ही मुले निरपराध आहेत; मात्र आता ती रस्त्यावर आली आहेत. त्यांचे करिअर धोक्यात येऊ शकते, अशी चिंता मुख्य न्यायमूर्ती त्रिपाठी यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबीयांची परिस्थितीही लक्षात घ्यावी आणि महाविद्यालयात परतावे, असे आवाहन न्यायालयाने केले. त्याचबरोबर आंदोलनामुळे शांतताप्रिय नागरिकांना किंवा पुणे शहराला कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील विश्वासार्हता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने कोणती पावले उचलणार, याचा स्पष्ट आराखडा न्यायालयात सादर करण्याचे निर्देश खंडपीठाने दिले. सरकारने तीन आठवड्यांत याबाबतचा अहवाल सादर करावा, असे आदेश देण्यात आले.

### राहुल गांधी, प्रियंका गांधी पोलिसांच्या ताब्यात

जंतरमंतरकडे निघालेल्या इंडिया आघाडीच्या बसच्या चाकातील हवा काढण्यात आली. पोलिसांनी हे कृत्य केल्यानंतर राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह खासदारांचा संताप पाहायला मिळाला. त्यानंतर रस्त्यावरच ठिय्या देण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व खासदार आणि इंडिया आघाडीचे नेते रस्त्यावर बसले पण पोलिसांनी त्यांना सातत्याने अडवलं. यावेळी पोलिसांनी धरपकड करत राहुल गांधींना पोलिसांनी उचलून नेलं. त्याचवेळी प्रियंका गांधी यांनाही महिला पोलिसांनी उचललं. मोदी, शाह आणि ज्ञानेश कुमारांनी लोकशाही हायजॅक केली असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला होता.

दरम्यान, आता पोलिसांच्या गाडीतून राहुल गांधी आणि प्रियंका यांनी हातात संविधान घेतलं आणि ते सर्वांना उंचावून दाखवलं. पण यावेळी मोठा गोंधळ झालेला पाहायला मिळाला. बसची हवा काढल्यानंतर प्रियंका खाली उतरल्या तेव्हा अत्यंत संतप्त झाल्या होत्या. त्यांनी बाहेर पडल्यावर प्रचंड मोठा नेत्यांचा रेटा पाहायला मिळाला. प्रियांकांनी ठिय्या दिला तेव्हा त्यांनी सांगितलं की देशाच्या खासदारांसोबत अशा स्वरुपाची वागणूक योग्य नाही. एसआयआर रद्द करा, ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्या, अशा प्रकारच्या मागण्या करण्यासाठी हे आंदोलन करण्यासाठी इंडिया आघाडीचे नेते सरसावले आहेत. पण दिल्ली पोलिसांनी त्यांना जंतरमंतरवर जाण्याआधीच रोखलं आहे. पोलिस आता ताब्यात घेतलेल्या खासदारांना कुठे घेऊन जाणार याकडे लक्ष लागलं आहे.

### स्मार्ट मीटरविरोधात शेकापचे रणशिंग

सुरेश खोत, निलेश खोत, संदीप गायकवाड, विक्रांत वार्डे, तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, ॲड. के.डी पाटील, दत्ता ढवळे, प्रमोद घासे, दिपक पाटील, आप्पा पिंगळे तसेच वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हुकूमशाही उलथून टाकण्यासाठी सज्ज व्हा - चित्रलेखा पाटील

उतरण्याची वेळ आली आहे. या खोतांना घालविल्याशिवाय शेकाप गप्प बसणार नाही, अशा इशारा शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे. तरुणवर्गदेखील या सरकारच्या भूमिकेविरोधात आक्रमक झाला आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर आहे. परंतु जिल्ह्यासह राज्यात सुरु असलेल्या सरकारी हुकूमशाही धोरणांविरोधात तीव्र संताप जनतेमध्ये निर्माण झाला आहे. या सत्ताधाऱ्यांना सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे बघण्यास वेळ नाही. परंतु टॉम ॲन्ड जेरीसारखे खोटे राजकारण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरु आहे. देशातील हूकुमशाही घालविण्यासाठी मोठे आंदोलन करण्याची वेळ आली आहे. आगामी काळात होणाऱ्या आंदोलनात लाखोच्या संख्येने सर्वसामान्यांनी सहभागी होऊन सरकारला त्यांची जागा दाखविण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

### मध्यान्ह भोजनाचा पुरवठा ठप्प

या योजनेतच जर धान्य आणि बिलांचा ताळमेळ नसेल, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. शासनाने तातडीने थकीत देयके अदा करून धान्य व तेलाचा नियमित पुरवठा करावा, अशी मागणी बचत गटांकडून होत आहे.

### टोरंटसाठीची सुनावणी शेतकऱ्यांनी उधळली

केल्यानंतर सुनावणीला विरोध झाला आणि अखेर शेतकऱ्यांनी ती बंद पाडली. जिल्हा भूसंपादन अधिकारी श्रीकांत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राहुल देवांग, निवासी नायब तहसीलदार मृणालिनी शिरसाट यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. भूसंपादन कायद्यानुसार पोहोच रस्त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा देण्यात आल्या असून, आलेल्या हरकतींवर सुनावणी घेण्यात आली.

दरम्यान, रस्ता नेमका कोणासाठी होत आहे, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी काही काळ उत्तर देऊ शकले नाहीत. शेतकऱ्यांचा आग्रह वाढल्यानंतर हा रस्ता टोरंट प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामग्री नेण्यासाठी तयार करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या उत्तरानंतर शेतकऱ्यांनी आम्हाला रस्ता नको आणि प्रकल्पही नको अशी भूमिका घेतली सुनावणीचे इतिवृत्त कोण लिहित आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला. ॲड. कैलास मोरे यांनी शेतकऱ्यांच्या हरकती नोंदविल्या जात नसल्याचा आरोप केला. पाली पोतल, सायडोंगर, भालीवडी, मोहमाळवाडी, आंबेवाडी व आंबोट परिसरातील शंभरहून अधिक शेतकरी उपस्थित होते. अखेर शेतकऱ्यांनी लेखी निवेदन देत सुनावणीला आक्षेप घेतला आणि ती बंद पाडली.

### चार कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त

त्याच्या ताब्यात ६०४ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी आढळून आली. या प्रकरणी विराज चौलकर याच्याकडे पोलिसांनी कसून चौकशी केली असता, त्याने हा साठा ऋतुराज रामचंद्र रघुवीर व त्याचे वडील रामचंद्र रघुवीर यांच्याकडून मिळवल्याचे कबूल केले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत रामचंद्र रघुवीर यांच्या राहत्या घरात छापा टाकून तेथून आणखी ३.३५६ किलोग्राम वजनाची व्हेल माशाची उलटी हस्तगत केली. अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना ७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि विजयकुमार देशमुख करीत आहेत. ही यशस्वी कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजू सोनावणे आणि श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाई करणाऱ्या पथकात सपोनि विजयकुमार देशमुख, पो.ह. अनिल हिवाळे, पो.ना. श्रीकांत सातपुते, पो.शि. कृष्णहरी कदम, दादासाहेब खिलारी, पांडुरंग तणपुरे, तैफिक शेख, विकास काळेल आणि म.पो.शि. कांचन जवान या सर्व श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

### नरेंद्र गायकवाड यांच्यावर कथित शाईफेक

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधिकारी मिलिंद खोपडे यांनी हे निवेदन स्वीकारले. दरम्यान,नरेंद्र गायकवाड यांच्या पत्नी मालती गायकवाड यांनी ३० सप्टेंबर रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर गायकवाड आणि त्यांच्या कुटुंबियांना भविष्यात कोणताही दबाव, धमकी किंवा प्रतिशोधाला सामोरं जावं लागू नये, यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई आणि सुरक्षेची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ आरपीआय पक्षाचे कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर आणि संघटक रविंद्र ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली आरपीआयचे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्ते पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाले. गायकवाड यांच्यावर झालेली कथित शाईफेक ही पक्षाच्या नेतृत्वावरील हल्ला असल्याचा आरोप प्रकाश मोरे यांनी केला, तर संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर व अन्य पदाधिकारी यांनी केली. यावेळी रायगड जिल्ह्यातील आरपीआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कळंबोलीत ध्वनी प्रदूषणाचा वाढता ताण

मर्यादित नसून वाहतूक, बांधकाम, धूळ आणि औद्योगिक हालचाली या सर्वांचा एकत्रित परिणाम तपासण्याची गरज आहे.दरम्यान, कळंबोली सर्कल आणि प्रमुख वाहतूक मार्गांवर सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा वेगवेगळ्या वेळेत ध्वनीची मोजणी करून प्रदूषणाचा प्रमुख स्रोत निश्चित करण्याची मागणी होत आहे.

तसेच बांधकामस्थळी धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना, अवजड वाहनांचे नियमन आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. कळंबोलीतील ७८.३ डेसिबलचा आवाज नेमका वाहनांचा, बांधकामाचा की अन्य कारणांचा, याचे उत्तर प्रशासनाच्या प्रत्यक्ष पाहणीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

### राष्ट्रवादीची हक्काची जागा निसटली

पाच वर्षांपूर्वी या मतदारसंघातून अरुण लाड हे निवडून आले होते. नंतरच्या राजकीय घडामोडी वेगळ्या असल्या तरी त्यावेळी झालेले मतदान हे पक्षाच्या चिन्हावर झाले होते. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावी, अशी आमची ठाम भूमिका होती, असे तटकरे यांनी सांगितले. महायुतीतील विधानपरिषदेच्या जागावाटपाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या स्तरावर झाल्याचे तटकरे यांनी स्पष्ट केले.

## निवडक



### संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीची उल्लेखनीय कामगिरी

**महाड :** संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवित तीन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. नवी दिल्ली येथील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित वर्ल्ड फिजिओथेरपी एशिया वेस्टर्न पॅसिफिक (डब्ल्यूपीएडब्ल्यूपी) या प्रादेशिक परिषदेदरम्यान झालेल्या विशेष समारंभात हे तीन प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आले. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी)चे अध्यक्ष डॉ.संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राधा भट्टड यांनी हे पुरस्कार स्वीकारले. संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच संस्थेचे प्रमुख रुग्णालय असलेल्या संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन (एसआयओआर)ला 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर अवॉर्ड' आणि 'स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर अवॉर्ड हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील आयएपी या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आलेले आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स फिजिओथेरपी शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतात.



### बाल संरक्षण धोरणाबाबत जागरूकता

**खांब :** जीवनधारा सामाजिक संस्था वरसगाव-कोलाड येथे चाइल्ड सेफगार्डिंग पॉलिसी अंतर्गत बाल संरक्षण धोरण आणि कायदेशीर प्रक्रियेबाबत जागरूकता शिबीर उत्साहात पार पडले. जीवनधारा सामाजिक संस्थेचे सर्व कर्मचारी वर्गाला प्रशिक्षित करणे हा या शिबिराचा उद्देश होता. प्रशिक्षणासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. ऋषीला उपस्थित होत्या. तसेच जीवनधारा संस्थेच्या संचालिका हिल्डा फर्नांडिस सी.एस.ए. कॉर्डिनेटर मेलनीटा, जीवनधारा आणि स्नेहवर्धिनी संस्थेचे स्टाफ असे एकूण ३० जणांनी सहभाग घेऊन प्रशिक्षण यशस्वी केले. प्रशिक्षणात ॲड. ऋषीला यांनी पॉस्को कायदा म्हणजे काय, त्याची गरज, लैंगिक शोषणाचे विविध प्रकार, त्यामध्ये लागू होणारी कलमे आणि त्यानुसार होणारी शिक्षा व दंड याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच एखाद्या मुलीवर अत्याचार झाल्यास गुन्हा कसा दाखल होतो, चाइल्ड सेफगार्डिंग पॉलिसी अंतर्गत आचारसंहिता आणि गोपनीयता काय आहे, आणि अशी घटना घडल्यास रिपोर्टिंग कसे करावे, चाइल्ड लाईन, पोलीस स्टेशन, बाल कल्याण समिती आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष येथे तक्रार कशी व कुठे नोंदवावी, एफआयआर आणि वैद्यकीय तपासणीची प्रक्रिया याबद्दल केस स्टडी आणि गट चर्चेच्या माध्यमातून अतिशय संवादात्मक पद्धतीने प्रशिक्षण दिले.



### रोशन टेमकर सैन्य दलातून निवृत्त

**चणेरा :** भारतीय सैन्य दलात तब्बल १७ वर्षे देशसेवा बजावल्यानंतर रोहा तालुक्यातील पडम कोळीवाड्यातील रोशन तानाजी टेमकर हे सेवेतून निवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर रेल्वेने रोहा रेल्वे स्थानकावर आगमन होताच गावकरी, टेमकर परिवार, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच माजी सैनिकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि देशभक्तीच्या जयघोषात त्यांची गावातून जंगी मिरवणूक काढण्यात आली. रोशन टेमकर यांनी २९ जून २००९ रोजी काश्मीर येथे भारतीय सैन्य दलात प्रवेश केला. देशाच्या सीमेवर प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावत त्यांनी आपल्या सेवाकाळातील १७ वर्षे देशसेवेला समर्पित केली. त्यांच्या सेवानिवृत्तीचे ठिकाण भटिंडा, पंजाब हे होते. लहानपणापासूनच भारतीय सैन्य दलात दाखल होऊन देशाची सेवा करण्याचे स्वप्न रोशन टेमकर यांनी उराशी बाळगले होते. कठोर परिश्रम, जिद्द आणि देशसेवेची भावना यांच्या जोरावर त्यांनी हे स्वप्न प्रत्यक्षात साकारले. रोशन टेमकर यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्यासाठी दापोली, रत्नागिरी येथील त्यांचे मित्र संदेश चव्हाण विशेष उपस्थित होते. संदेश चव्हाण आणि रोशन टेमकर हे एकाच दिवशी भारतीय सैन्य सेवेतून निवृत्त झाले. त्यांनी रोशन यांची भेट घेऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या स्वागत सोहळ्याला गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच मोठ्या संख्येने माजी सैनिक उपस्थित होते.

### 'एक झाड आईच्या नावे' अभियान



**खांदेश्वर :** पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान २०२६' तसेच 'एक झाड आईच्या नावे' अभियानांतर्गत प्रभाग क्रमांक १९ मध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पाण्याच्या टाकीजवळ, मार्केट यार्ड परिसरात हा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसरात विविध झाडांची लागवड करण्यात आली. 'एक झाड आईच्या नावे' या उपक्रमातून नागरिकांनीही वृक्षसंवर्धनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांची नियमित निगा राखणे आणि त्यांचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्यासह स्वच्छता निरीक्षक रीना बेहेरे, महेंद्र भोईर, जयेश कांबळे, पर्यवेक्षक तसेच स्वच्छता दूत उपस्थित होते. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. शहरातील वाढते प्रदूषण आणि तापमानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित होत आहे. त्यामुळे केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक झाडाची जबाबदारी घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

# जेएनपीएत मालाच्या वाहतुकीस विलंब

## ।। वाहतूकदारांचे मोठे आर्थिक नुकसान ।। रस्त्यांवर संथगतीने चालणाऱ्या वाहनांची गर्दी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मागील चार पाच दिवसांपासून जेएनपीए अंतर्गत बंदरे आणि सीएफएस परिसरातील सातत्याने होणारी वाहतूक कोंडींची समस्या चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. यामुळे मालवाहतूकीसाठी होणाऱ्या विलंबामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडलेल्या वाहनचालक व वाहतूकदारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. उद्भवलेल्या या गंभीर समस्येची विविध आयात-निर्यातदार कंपन्या, शिपिंग लाईन्स, सीएफएस आदींना माहिती करून देण्यासाठी विविध वाहतूकदार संघटनांनी व्यापारी सुचना जारी केली आहे.



जेएनपीए येथील पोर्ट टर्मिनल्स आणि सीएफएस दरम्यान एक्झिम कंटेनर्सच्या वाहतुकीत सातत्याने व्यत्यय येत आहे. यामुळे बंदर, विविध सीएफएसमध्ये येजा करणारे हजारो कंटेनर ट्रेलर उरण, जेएनपीए परिसरातील ठिकाणांच्या रस्त्यांवरच ४०-६० तासांपर्यंत अडकून पडतात. अनेक वेळा तर अडकून पडलेल्या वाहनांच्या रांगा जेएनपीए -एनएसआयसीटी ते द्रोणगिरी हद्दीतील डीआरटी पुलाच्या पलीकडे सुमारे १५ किमी अंतरापर्यंत जात आहेत. ज्यामुळे एनएसआयसीटीच्या प्रवेशद्वाराबाहेर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.

### पुरेशी संसाधने तैनात करा

एनएसआयसीटी बंदराच्या गेटच्या बाहेरील वाहतूक व्यवस्थापन व्यवस्थेचा तात्काळ आढावा घेऊन त्यामध्ये सुधारणा करावी. वाहतूक कोंडी बाधित भागांमध्ये वाहनांची सुरळीत आणि नियंत्रित वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी संसाधने तैनात करावीत, वाहनांच्या अतिरिक्त रांगा कमी करण्यासाठी आणि वाहनांची परत येण्याची वेळ पुन्हा वाजवी परिचालन पातळीवर आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या आदी सूचनाही करण्यात आली आहे.

यामुळे कंटेनर ट्रेलरसाठी नाहक प्रतीक्षा आणि टर्नअराउंड वेळात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे जेएनपीए अंतर्गत असलेली पाचही बंदरे आणि विविध सीएफएस, टर्मिनलकडे जाणाऱ्या रस्त्यांवर संथगतीने चालणाऱ्या वाहनांची गर्दी होत आहे. मागील ४ ते ५ दिवसांपासून तर एनएसआयसीटी टर्मिनलवरील वाहतूक परिस्थितीच्या साखळी परिणामामुळे गर्दी गंभीर टप्प्यावर पोहोचली आहे. यामुळे टर्मिनलकडे जाणाऱ्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे होणारा विलंब हा सीएफएसच्या नियंत्रणाबाहेर आहे. ज्यामुळे इतर टर्मिनल्सकडे जाणाऱ्या वाहतुकीतही मोठी अडचण निर्माण झाली आहे.

सर्वात चिंताजनक बाब म्हणजे, सामान्य कार्यचक्राच्या तुलनेत वाहनांची ये-जा करण्याची वेळ अस्वीकार्य अशा २०-२५ तासांपर्यंत वाढला आहे. अशा अतिरिक्त विलंबामुळे वाहने पडून राहणे, चालकांना थांबवून ठेवणे, इंधनाचा वाढलेला वापर आणि वाहनांच्या तैनातीतील व्यत्यय यामुळे वाहतूकदारांना मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यातून निर्माण होणाऱ्या अकार्यक्षमतेचा परिणाम आयात-निर्यात एक्झीम मालाच्या एकूण वाहतुकीवरच नव्हे तर जेएनपीए बंदरातून होणाऱ्या व्यापारावरही विपरीत परिणाम होत आहे. परिस्थिती आता अशा टप्प्यावर पोहोचली आहे की चालक आणि वाहतूकदारांमध्ये प्रचंड निराशा आणि नाराजी आहे.

## निवडक

### ॲड. मानसी म्हात्रे यांचा वरवठणे शेतकऱ्यांतर्फे सत्कार



**नागोठणे :** रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी ॲड. मानसी म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अलिबाग बार असोसिएशनच्या इतिहासात उपाध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या महिला पदाधिकारी ठरल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल विधी क्षेत्रासह विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ॲड. म्हात्रे यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याचे समजताच नागोठण्याजवळील वरवठणे येथील त्यांचे पक्षकार असलेल्या संतोष बैकर, परशुराम बैकर, भगवान राणे, सुनील राणे, मंगेश बैकर आदी शेतकऱ्यांनी केले ॲड. म्हात्रे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचे अभिनंदन केले आहे. आगामी काळात बार असोसिएशनच्या विविध उपक्रमांसाठी त्या सक्रियपणे योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ॲड. म्हात्रे यांच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल त्यांचे सहकारी वकील, मित्रपरिवारांकडून अभिनंदन करुन पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छां देण्यात आल्या.

### गायन स्पर्धेत अनिल पवारांचा प्रथम क्रमांक

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील अंकुश परदेशी मित्र मंडळाच्या वतीने साखर चौथ गणेश उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कराओके हिंदी मराठी गीत गायन स्पर्धेत चिरनेरच्या अनिल पवार या आदिवासी समाजातील गायकाने प्रथम क्रमांक पटकाविला.



पवार यांनी आपल्या गायनातून देशभक्तीपर गीत प्रभावीपणे सादर करून, देशभक्तीचा इतिहास उभा केला. त्यांनी केलेल्या देशभक्तीच्या जागरामुळे उपस्थित प्रेक्षक वर्ग भारावून गेला. त्याला ११,१११ रुपये रोख रक्कमेचे पारितोषिक व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तर मानखुर्द येथील गायिका प्रिया मांजरेकर द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली. तिला ५,५५५ रुपयांचे रोख रक्कमेचे बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले. मोठेभोम येथील प्रांजल पाटील ही तृतीय क्रमांकाची धनी ठरली. तिला २,२२२ रुपये रक्कमेचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. अलिबागचा विक्रांत पाटील चतुर्थ क्रमांकाचा विजेता ठरला. त्याला १,१११ रुपयांचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. चिरनेरचा नरेश पाटील हा पाचव्या क्रमांकाचा मानकरी ठरला. त्याला १,१११ पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेत मुंबई, नवी मुंबई, सांगली, उरण, पनवेल, पेण, अलिबाग येथील स्पर्धकांनी सहभाग घेऊन, एकाहून एक सरस अशी हिंदी- मराठी गीते सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत कार्यक्रमात रंगत आणली.

### महाआरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**कोर्लई :** मानसी फाऊंडेशनतर्फे अलिबाग तालुक्यातील बामणोली येथे उज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान व लायन्स क्लब, तेरणा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ञ डॉक्टरांनी जनरल तपासणी, स्त्रीरोग तपासणी, नेत्ररोग तपासणी, ईसीजी, रक्तातील साखर तपासणी तसेच रक्तदाब तपासणी अशा विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या तसेच शिबिरासाठी सर्वप्रथम नोंदणी करणाऱ्या पहिल्या ५० लाभार्थ्यांना मोफत रीडिंग चष्म्यांचे वाटप करण्यात आले.



उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे डॉ. राज, डॉ. स्टाफ, तेरणा डॉ. स्टाफ यांनी लाभार्थ्यांची विविध आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये जवळपास ८५ लाभार्थ्यांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 50,000 Per Month, Location Zirad. Contact - 9823585321
- **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 Per Month, Location : Bamansure, Chondli. Contact - 9823585321.
- **पाहिजे :** सकाळी दहा ते बारा आणि फुलटाईम घरकामासाठी बाई संपर्क : ८५३०३०९७६५
- **नोकरीची सुवर्ण संधी :-** अलिबाग बालाजी नाका येथे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर ऑफिस मध्ये Tally आणि एक्सेलच्या कामामध्ये अनुभव असलेले २ अनुभवी accountant पाहिजे. मुलगी/मुलगा. ज्यांना Tally चे आणि Excel चे ज्ञान व अनुभव आहे, त्यांनी या संधीचा नक्की लाभ घ्यावा. इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क - +९१ ८२३७२८८२४१/+९१ ८१८००६८७७४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## कुंभारवाड्यात घट बनविण्याची लगबग

**। खादा कॉलनी । प्रतिनिधी ।**

घटस्थापनेची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. नवरात्रोत्सवात देवीसमोर गरबा घटाची स्थापना करण्याची परंपरा असल्याने पनवेलमधील कुंभारवाड्यात गरबे तयार करण्याचे काम जोरात सुरू आहे. पनवेलच्या बंदर रोड परिसरातील कच्छी मोहल्ल्यातील कुंभारवाड्यात सध्या विविध आकारांचे आणि रंगांचे गरबे तयार करण्यात येत आहेत. कुंभारांकडून मातीला आकार देऊन त्यावर आकर्षक रंगकाम आणि नक्षीकाम केले जात आहे. त्यामुळे तयार झालेले रंगीबेरंगी गरबे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. गरब्यांवर करण्यात येणारे बारीक



नक्षीकाम, विविध रंगांची सजावट आणि आकर्षक डिझाइन यामुळे पारंपरिक गरब्यांना आधुनिक रूप मिळाले आहे. काही गरब्यांवर फुलांची नक्षी, तर काहींवर पारंपरिक कलाकुसर करण्यात आली आहे.

पारंपरिक मातीच्या गरब्यांना नागरिकांकडून पसंती मिळत आहे. कुंभारवाड्यात तयार होणाऱ्या गरब्यांची किंमत त्यांच्या आकारमानानुसार आणि केलेल्या नक्षीकामानुसार ठरवली जात आहे. साधारणपणे पाचशे रुपयांपासून एक हजार रुपयांपर्यंत विविध प्रकारचे गरबे उपलब्ध आहेत.

त्यामुळे कुंभारवाड्यात दिवसभर गरबे तयार करण्याची लगबग सुरू असून, कारागिरांच्या हातांना वेग आला आहे. मातीला आकार देण्यापासून ते रंगकाम आणि नक्षीकाम करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कारागिरांची मेहनत दिसून येत आहे. त्यांच्या हातून साकारलेले हे पारंपरिक गरबे सजावटीला खास आकर्षण देणार आहेत. देवीच्या आगमनाची चाहूल लागली असून, कुंभारवाड्यात तयार होणाऱ्या रंगीबेरंगी गरब्यांमुळे पनवेलमध्ये नवरात्रोत्सवाचा उत्साह आणखी वाढला आहे.

## मतदार नाव नोंदणीचे मार्गदर्शन

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय, निवडणूक विभाग उरण यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मतदार यादी नाव नोंदणी कार्यक्रमाचे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांनी मतदार यादी नाव नोंदणीचे मार्गदर्शन केले. यावेळी ओमय परब यांनी ऑनलाइन फॉर्म कसा भरावा याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विनिता तांडेल यांनी व्यक्त केले.

## 'कलावंतांसाठी पोलीस संघटनेच्या उपोषणाला पाठिंबा'



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील लोकमान्य टिळक चौक येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज वृद्ध कलावंत योजनेतील प्रत्येक वर्षी एका जिल्ह्याला १०० लाभार्थी मंजूर करण्याचे शासनाचे धोरण आहे. ही मागणी घेऊन पोलीस मित्र संघटना उपोषण करीत असेल त्या उपोषणाला आपला पाठिंबा आहे असे समितीचे जिल्हा सदस्य कैलास भोईर यांनी घेतली. कर्जत तालुक्यातील कोणतही लाभार्थी वृद्ध कलावंत योजनेपासून वंचित राहणार नाही असा निर्धार भोईर यांनी केला. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भोईर यांनी पत्रकार परिषद घेऊन उपोषणाला संपूर्ण वारकरी संप्रदायाचा जाहीर पाठिंबा जाहीर केला.

## 'ऑनलाइन आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा'

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि ऑनलाइन फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सायबर सुरक्षा जनजागृती व्याख्यानाचे आयोजन सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, विद्यार्थिनींनी शक्यतो आपला फोटो आपल्या मोबाईलमध्ये काढू नये. त्याचा गैरफायदा घेऊन पुढे खूप अडचणी येऊ शकतात. बँकेच्या किंवा अन्य महत्वाच्या कामांसाठी वेगळा मोबाईल नंबर व साधा मोबाईल वापरल्यास अधिक सुरक्षित होऊ शकते. तसेच आपली वैयक्तिक माहिती, ओटीपी, संकेतशब्द अथवा बँकिंगविषयक माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत शेअर न करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

याप्रसंगी विजय मांडे, उप प्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, चंद्रकांत रावते, विठ्ठल घावस, डॉ. निलोफर खान सुनिल पंडित, पूजा धनगरं, प्रकृती सिंग, विजय जिनगरे, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता कर्वे आणि सुष्मिता मजली यांनी केले.

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व्याख्यानाचे आयोजन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे अभिजात मराठी भाषा गौरव वर्धापन दिनानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद, म्हसळा शाखेचे अध्यक्ष प्रा. रायप्पा माशाळे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा. माशाळे यांनी मराठी भाषेला प्राप्त झालेला अभिजात दर्जा, तिचे स्वरूप, व्याप्ती आणि ज्ञानभाषा म्हणून होत असलेली वाटचाल याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मराठी भाषेच्या उगमापासून आधुनिक मराठी साहित्यापर्यंतचा ऐतिहासिक प्रवास त्यांनी विविध दाखले देत उलगडून सांगितला. प्रा. जितेंद्र मांजरेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## एटीममधील रक्कम लांबवणारा अटकेत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

एटीएममधून पैसे काढणाऱ्या ग्राहकांची रक्कम कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्येच अडकवून ती परस्पर लांबवणाऱ्या चोरट्याला तळोजा पोलिसांनी रंगेहाथ पकडले. अकिब मो. इर्शाद खान (२२) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही कमांड सेंटरमधील अंमलदारांची सतर्कता आणि बीट मार्शलच्या तत्परतेमुळे ही कारवाई शक्य झाली. तळोजा येथे राहणारा अकिब खान हा एटीएमच्या कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्ये विशेष प्रकारची पत्र्याची पट्टी अडकवून ग्राहकांची रक्कम बाहेर न पडता स्लॉटमध्येच अडकवण्याची युक्ती वापरत होता. त्यानंतर ग्राहक निघून गेल्यानंतर अडकलेली रक्कम काढून घेण्यात येत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले.

तळोजा फेज-१ येथील ॲक्सिस बँकेच्या एटीएममध्ये अकिब हा कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्ये पत्रा अडकवत असताना त्याची संशयास्पद हालचाल सीसीटीव्ही कमांड सेंटरमधील पोलिसांच्या निदर्शनास आली. कमांड सेंटरमधील अंमलदारांनी तत्काळ गस्तीवरील पोलिसांना माहिती देत संशयिताचा फोटो व व्हिडीओही पाठविला.

माहिती मिळताच बीट मार्शल-१ वर गस्त घालणारे पोलीस हवालदार लुवीस मोजेस लॉजरेस आणि पोलीस शिपाई अभिजीत इनामदार यांनी तातडीने एटीएम केंद्र गाठले. एटीएमची पाहणी केली असता कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटजवळ डबल चिकट टेप लावलेली निळ्या रंगाची सुमारे २.५ इंच रुंद, १० इंच लांब आणि १ इंच जाडीची पोकळ पत्र्याची पट्टी आढळली.

पोलिसांनी ही पट्टी ताब्यात घेतल्यानंतर एटीएमबाहेर संशयिताचा शोध घेतला असता सीसीटीव्ही कमांड सेंटरमधून पाठविण्यात आलेल्या छायाचित्रातील व्यक्ती अकिब खान रस्त्यावर उभा असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीने अशाच पद्धतीने आणखी किती ग्राहकांची रक्कम लांबवली आहे, याचा तपास तळोजा पोलीस करीत आहेत. सीसीटीव्ही फुटेज आणि आरोपीच्या चौकशीतून या प्रकारातील आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## पावसाअभावी भातशेती संकटात

**। खांब । प्रतिनिधी ।**

यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने रायगड जिल्ह्यातील भातशेतीवर मोठा परिणाम झाला असून, रोहा तालुक्यातील अनेक भागांमध्ये भातशेती पाण्याअभावी कोरडी पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. रायगड जिल्हा हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. मात्र यंदाच्या हंगामात पावसाने ओढ दिल्याने भात पिकाच्या वाढीवर गंभीर परिणाम झाला आहे. वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाऊस न झाल्यामुळे अनेक शेतांमध्ये पाण्याची कमतरता



निर्माण झाली असून, भातपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेषतः रोहा तालुक्यातील परिस्थिती बिकट झाली असून, पावसाअभावी शेतकरी चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत रोहा तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात आलेला नसल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर कृषीनिष्ठ शेतकरी बाबूराव बामणे यांनी रोहा तालुक्याचाही दुष्काळग्रस्त तालुक्याच्या यादीत समावेश करावा, अशी मागणी केली.

पावसाअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, शासनाने रोहा तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत व दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही बाबूराव बामणे यांनी व्यक्त केली. दरम्यान, भातपिकाचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शासनाने तातडीने परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## स. म. वडके विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा उत्साहात



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. स. म. वडके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, चोंढी-किहीम येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत २६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमास सुवेगा पाटील, नम्रता म्हात्रे, स्वागता पाटील, नाशिक पेढवी, सचिन बालघरे, विकास पवार मिनल सावंत, संस्कृती पेडणेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोईर यांनी केले, तर समारोप उर्मिला जोशी यांनी केला.

**प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची पथके तैनात** | **वाढत्या संख्येवर नियंत्रणासाठी नगरपरिषदेची मोहिम**

## श्रीवर्धनमध्ये भटक्या श्वानांची धरपकड

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

शहरातील वाढत्या भटक्या श्वानांच्या संख्येमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन नगरपरिषदेने अखेर धडक मोहीम हाती घेतली आहे. १० सप्टेंबरपासून सुरू करण्यात आलेल्या भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल १७७ श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

गेल्या काही महिन्यांत शहरातील विविध भागांमध्ये भटक्या श्वानांची संख्या वाढल्याने महिला, लहान मुले, ज्येष्ठ





नागरिक तसेच दुचाकीस्वारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी नगरपरिषदेने ही विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेसाठी नगरपरिषदेने प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची पथके तैनात केली असून, विशेष वाहनांच्या सहाय्याने श्वानांना सुरक्षितपणे पकडण्यात येत आहे. पकडलेल्या श्वानांना रानवली येथील सर्व सुविधांनी युक्त विशेष केंद्रात नेण्यात येते. तेथे शास्त्रोक्त पद्धतीने निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात येत आहे. उपचारानंतर आवश्यक ती काळजी घेऊन श्वानांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडण्यात येत आहे.

### मोहीम १० सप्टेंबरपासून सुरू

- आतापर्यंत १७७ श्वानांवर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया.
- रेबीज प्रतिबंधक लसीकरणही सुरू.
- रानवली येथे विशेष उपचार केंद्राची सुविधा.
- प्रशिक्षित पथकांकडून श्वान पकडण्याची कार्यवाही.

नगरपरिषदेच्या या धडक कारवाईमुळे श्वानदंशाच्या दहशतीखाली असलेल्या श्रीवर्धनकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणून शहर अधिक सुरक्षित व भयमुक्त करण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची ठरत आहे. नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत असून, ही मोहीम सातत्याने राबवून भटक्या श्वानांच्या संख्येवर कायमस्वरूपी नियंत्रण आणावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे

नगरपरिषदेच्या या धडक मोहिमेमुळे लवकरच श्रीवर्धन शहरातील भटक्या श्वानांची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येईल आणि नागरिकांना भयमुक्त वातावरण मिळेल, असा विश्वास अनंत गुरव यांनी व्यक्त केला.

## लोकनृत्य स्पर्धेत कोंकण ज्ञानपीठचा द्वितीय क्रमांक

**उरण :** मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत लोकनृत्य या स्पर्धेत कोंकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, विद्यार्थी, शिक्षक व महाविद्यालयीन प्रशासनाकडून विजेत्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या अंतिम फेरीत मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत तब्बल ५७ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरणच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणातून परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांक मिळवला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चंपा दत्तु ऐनकर, इंदुबाई दत्तु ऐनकर, पांडुरंग दत्तु ऐनकर, रमन मारुती ऐनकर | ६ | ३/अ/१ | ०-४६-० | १-१५ |
| | यापैकी लिहुन देणार यांच्या अविभक्त मालकीचे विक्री क्षेत्र हे ० आर १७ पॉ.०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,ता.कर्जत,जि.रायगड ४१०२०१

सही/-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक ०८-१०-२०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे ओलमन, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११३/२ | एकूण क्षेत्र ३-३४-०० हे.आर | २.२५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-८/१०/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेणेच्या ठरविलेले आहे.

सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| मौजे | सर्व्हे नं | पोट.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| चेंढरे | ९० | ३अ | २ | ०-०१-७६ | १७-६० |
| चेंढरे | ९० | ३अ | ३ | ०-०१-५७ | १५-७० |
| चेंढरे | ९० | ३अ | ४ | ०-००-७१ | ०७-१० |
| चेंढरे | ९० | ३अ | ५+६ | ०-०१-१५ | ११-५० |
| चेंढरे | ९० | ३अ | ७ | ०-०२-६० | २६-०० खुले क्षेत्र |
| चेंढरे | ९० | ३अ | ८ | ०-००-८७ | ०८-७० |
| चेंढरे | ९० | ३अ | ९ | ०-००-५५ | ०५-५० |
| चेंढरे | ९० | ३अ | १० | ०-००-५८ | ०५-८० |
| चेंढरे | ९० | ३अ | ११ | ०-००-५६ | ०५-६० |
| चेंढरे | ९० | ३अ | १२ | ०-००-५६ | ०५-६० |
| चेंढरे | ९० | ३अ | १३ | ०-००-५६ | ०५-६० |
| चेंढरे | ९० | ३अ | १४ | ०-००-५२ | ०५-२० |
| चेंढरे | ९० | ३अ | १५ | ०-००-८७ | ०८-७० |
| चेंढरे | ९० | ३अ | १६ | ०-००-७३ | ०७-३० |
| चेंढरे | ९० | ३अ | १७ | ०-००-५१ | ०५-०० |
| चेंढरे | ९० | ३अ | १८+१९ | ०-०१-११ | १०-१० |
| चेंढरे | ९० | ३अ | २१ | ०-०५-३६ | ५३-६०अंतर्गत रस्ता |

वर नमुद वर्णनाच्या मिळकती या निर्वेध व निंजोखीम असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना करून दिलेली आहे. या गोष्टीची पडताळणी करणेकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे.

तरी सर्व लोकांस असे कळविणेत येते की, वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचेही साठेकरार खरेदीखत दान, लिन, बक्षीसपत्र, वहीवाट वगैरे अन्य कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यासंबंधी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांचेकडे आठ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर विहीत मुदतीत जर कुणाचीही कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे तसेच मुळ मालकांकडे न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निंजोखीम आहे असे समजून आमचे अशिल सदर विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील अशा परिस्थीतीत मग मागाहून येणारी कोणाचीही कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

अलिबाग
दि. ०७/१०/२०२६

सही/-
**श्री.संतोष एकनाथ म्हात्रे**
ॲडव्होकेट
''देवगिरी'', कामत आळी, अलिबाग-रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक रामचंद्र देवराम सुतार वगैरे ४ रा.नवघर, ता.सुधागड, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| २५२ | ०-४०-० | ६.२४ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत वरील मिळकतीचे खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक :०७/१०/२०२६

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५

प्रो.जमा रू. ५०/-

अर्जदार तर्फे वकील
ॲड.रुपेश कृष्णा पाटील

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो यांचे कोर्टात.**

### जाहीर नोटीस

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३६/२०२६
निशाणी नं १०/ड

श्रीमती कमल पांडुरंग घरत
वयः ७१ वर्षे, धंदा-गृहिणी, — अर्जदार
रा.रामवाडी, ता.पेण, जि.रायगड

विरूद्ध

१. श्री. सचिन पांडुरंग घरत
वयः ४६ वर्षे, धंदा-व्यवसाय,
वरील दोघे रा. रामवाडी, ता.पेण, जि. रायगड
२. सौ. संजिवनी दिपक ठाकुर — सामनेवाला
वयः ४५ वर्षे, धंदा-गृहिणी
रा.२०२, अभिगुंज को.ऑप.हौ.सोसा, दशरथ कुरघोडे मार्ग, दांडेकर हॉस्पिटलच्या मागे, जुने पनवेल
३. सौ. सुचिता संदीप पाटील
वयः ४३ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. पेण, ता.पेण, जि.रायगड

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे पती व सामनेवाला नं. १ ते ३ यांचे वडील कै.पांडुरंग नारायण घरत हे दि. ०४/११/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या पच्छात अर्जदार हे कायदेशिर वारस आहेत व तसा दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर. सो. यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जदारां व्यतिरीक्त कै. पांडुरंग नारायण घरत यांना कोणी वारसदार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत या चौकशी अर्जाच्या कामी आपली हरकत लेखी कागदोपत्री पुराव्यांसहीत दाखल करावी.

जर कोणी या चौकशी अर्जाचे कामी हजर राहून आपली हरकत लेखी कागदोपत्री पुराव्यांसहीत दाखल केली नाहीत तर कै. पांडुरंग नारायण घरत यांना अर्जदार हे वारसदार आहेत असे समजून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व त्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

सदरची नोटीस आज तारीख १९/११/२०२६ रोजी माझ्या सहीनीशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली आहे.

सही /-
**(वरिष्ठ/कनिष्ठ लिपीक)**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग, जि.रायगड**

**न्यायालयीन शिक्का**

सही /-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

दि : ०७/१०/२०२६

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे बोर्झे, ता.पेण, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतींचे विद्यमाने मालक/कब्जेदारांपैकी १ श्री. उत्तम दिनकर ठाकूर आणि २. श्री.कृष्णा दिनकर ठाकूर यांच्या हिस्स्याच्या ०हे.-२१आर.६५चौ.मी. क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-बोर्झे, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| कल्पना रविंद्र घरत<br>उत्तम दिनकर ठाकूर<br>कृष्णा दिनकर ठाकूर<br>सुनिल दिनकर ठाकूर<br>हनुमान दिनकर ठाकूर<br>वंदना दशरथ पाटील<br>जोस्ना रामकृष्ण म्हात्रे | ४८३ | अ | ०-७५.८०<br>पैकी ०-२१.६५ | ८.६८ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. एकुमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १.श्री.उत्तम दिनकर ठाकूर आणि २. श्री कृष्णा दिनकर ठाकूर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: ०८/१०/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हो.सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

### निविदा सुचना

दिनांक -८/१०/२०२६

ग्रामपंचायत साले ता. माणगाव, जि. रायगड यांचेकडून खालील नमूद कामाकरिता ग्रा. प. हद्दीत बांधकाम ठेकेदाराकडून शासनाच्या अटी व शर्तीस आधीन राहून सिलबंद निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा ग्रामपंचायत साले कार्यालयाकडे दि. १४/१०/२०२६ पर्यत कार्यालयात वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्वीकारण्यात येतील.

| कामाचे नाव व ठिकाण | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) | काम पुर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम | निविदा सादर करणेची वेळ: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| साले बौद्ध विहार दुरुस्ती करणे व समोर शेड बांधणे | १५% मागास वर्गीय | १८६६००/- | ६ महिने | २०० | १८६६ /- | १४/१०/२०२६ | सायंकाळी ६ वाजता | ग्रामपंचायत कार्यालय साले |
| तिलोरे बौद्ध विहार दुरुस्ती करणे | १५% मागास वर्गीय | १८६६००/- | ६ महिने | २०० | १८६६/- | १४/१०/२०२६ | सायंकाळी ६ वाजता | ग्रामपंचायत कार्यालय साले |

**अटी व शर्ती**

१) सहभागी ठेकेदाराने निविदा मिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक.
२) कोऱ्या निविदा प्रसिद्धीच्या दिनांकापासून निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच उपलब्ध होतील. निविदा फॉर्म निविदा फी घेताना कार्यालयात रोख स्वरुपात जमा करून त्याची पावती घेणे आवश्यक राहील. अन्यथा सदरची फी कार्यालयात बँक खातेमध्ये जमा करून जमा केलेली पावती सादर केल्यास कोऱ्या निविदा प्राप्त होतील.
३)अंदाजपत्रकातील १२%अथवा १८% जी एस. टी. हा मूळ अंदाजपत्रकातील असल्याने मंजुर ठेकेदारांना सदरचा जि.एस.टी हा मंजुर निविदेनुसार असा केला जाईल
४) खाडाखोड व दुरुस्ती केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
५) निविदा मंजुर व नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवलेले आहेत.
६) मंजुर निविदा धारक ठेकेदारास रुपये ५००/- बॉड पेपरवर असणाऱ्या अटी शर्तीना अधीन राहून स्वखर्चाने करारनामा करणे बंधनकारक राहील.
७) मंजुर विकास कामाचा निधी हा संबधित कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे अदा केला जाईल.
८) प्राप्त निविदा दि.१५/१०/२०२६ रोजी सकाळी ठिक स. १२:०० वा. उघडण्यात येतील.
९) निविदा धारकाने निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबतची सुचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत साले ता.माणगाव जि.रायगड**

सही/-
**प्रशासक**
**ग्रामपंचायत साले ता.माणगाव जि.रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील कोकण कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादित, भालिवडी (सावळा) या सोसायटीमधील प्लॉट मिळकत व त्यावरील घर मिळकत आमच्या अशिलांनी तिच्या मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर प्लॉट मिळकत व त्यावरील घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**

**वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | प्लॉट नंबर | एकूण क्षेत्र चौ.फुट | भाग प्रमाणपत्र क्र. |
|---|---|---|---|
| सैईफुद्दीन जे. दोहादवाला | ३२६ | १३,५००.०० | ३२६ |

तसेच या मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत भालिवडी घर मिळकत क्र.३१६

तरी सदर प्लॉट मिळकत व त्यावरील घर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्क-हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, संबंधित व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील स्वाक्षरी करणाऱ्यांकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.:९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

दिनांक : ०७ ऑक्टोबर २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) विद्या वासुदेव पाटील<br>२) वासुदेव नारायण पाटील | ५८ | १ | ४-२३-०० | ३ | ४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक:-०७/१०/२०२६

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक - सोनाली सुधिर सरदार यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरुपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे नांदईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक २६०, एकूण क्षेत्रफळ ००.४३.३० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.३७.७० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०५.६० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ८.९५, ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक ८ ऑक्टोबर २०२६
क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
(+९१ ९८३३६ २५१९५)

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक - (१) मिलिंद गजानन चव्हाण (२) सुचिता मिलिंद चव्हाण यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून ७ (सात) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे नांदईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक २६६/२, एकूण क्षेत्रफळ ००.३०.०० हे.आर.चौ.मी.(लागवडीयोग्य क्षेत्र ००.२१.१० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०८.९० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ०.३५, ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह,

ठिकाणः मुंबई
दिनांक ८ ऑक्टोबर २०२६
क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
(+९१ ९८३३६२५१९५)

### जाहीर नोटीस

दि.०८/१०/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) संध्या धर्माजी पाटील २) अनिल धर्माजी पाटील ३) सुनिल धर्माजी पाटील ४) रुपेश धर्माजी पाटील सर्व रा.बांधण, आंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड ५) संगिता संदेश म्हात्रे रा. पेझारी पो.आंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | १३७/३ | ०-४२-५०<br>पो.ख ०-७-३०<br>एकुण ०-४९-८० | ८.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी १) संध्या धर्माजी पाटील, २) संगिता संदेश म्हात्रे ३) अनिल धर्माजी पाटील ४) सुनिल धर्माजी पाटील ५) रुपेश धर्माजी पाटील यांच्या हिश्यातील ०-३६-५० हे.आर पो ख ०-०७-३० हे.आर एकुण ०-४३-३० हे.आर आकार ६.८७ रु.पै या मिळकतीपैकी ०-१८-०० हे.आर ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता.अलिबाग जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवघर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक धरती निलेश राऊत यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| देवघर, ता.अलिबाग. जि. रायगड | २२५ | २-४८-३० जिरायत<br>०-०४-५० बागायत<br>०-०२-०० वरकस<br>०-४२-७० पो.ख.<br>२-९७-५० एकुण क्षेत्र | ५८.३१ |

वर नमुद जमिन मिळकतीपैकी असणारा धरती निलेश राऊत यांचा अविभक्त हिस्सा या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक ०७/१०/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव,ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे मालक श्री. विशाल दिलीप माळी रा. गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३७/१/ब | एकूण क्षेत्र ०-२७-०६ यापैकी विशाल दिलीप माळी यांचे अविभक्त हिस्स्याचे ०-१८-०४ | ३-३१ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०७/१०/२०२६

सही/-
**ॲड. गणपत का.फुलावरे ॲड.गीतांजली जी.फुलावरे**
कार्यालय पत्ताः ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/७७७५९९३०८८


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याच ने– तन्मणी, चींचपेट गड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### कांगारूंसमोर भारताची शरणागती

नवी दिल्ली : ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने मंगळवारी (दि.६) भारत 'अ' संघाविरुद्ध पहिल्या एकदिवसीय सामन्यात १२५ धावांनी दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. ऑस्ट्रेलिया 'अ' संघाकडून नॅथन मॅकस्विनी, कर्णधार विल सदरलँड आणि माहली बिअर्डमन यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. भारताकडून रजत पाटीदारने एकाकी झुंज दिली; परंतु, त्याची झुंज व्यर्थ ठरली. या सामन्यात ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने भारतीय 'अ' संघासमोर २७५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय 'अ' संघ ३१.४ षटकात १४९ धावांवरच सर्वबाद झाला. या सामन्यात भारताकडून साई सुदर्शन आणि प्रभसिमरन सिंग यांनी डावाची सुरुवात केली होती. मात्र, दुसऱ्या षटकात सुदर्शन १ धावेवरच बाद झाला. त्यानंतर देवदत्त पडिक्कल शून्यावर, तर आक्रमक खेळणारा प्रभसिमरन १७ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड १५ धावांवर बाद झाला. निशांत संधूही ३१ धावांवर बाद झाला. लगेचच सूर्यांश शेडगे ३ धावांवर बाद झाला. तरी एक बाजू अर्धशतक करत पाटीदारने सांभाळली होती. मात्र, पाटीदारही ५३ धावा करून बाद झाला. त्यानंतर मात्र अनुकूल रॉय (५), विपराज निगम (१३) आणि अर्शद खान (०) हे स्वस्तात बाद झाले आणि भारताचा डाव १४९ धावांवरच संपला.

### सांगलीची लेक बनली कर्णधार

**मुंबई** : अष्टपैलू खेळाडू हरमनप्रीत कौरने मंगळवारी (दि.६) भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार होत असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर लगेचच भारतीय महिला निवड समितीने आगामी झिम्बाब्वे विरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय महिला संघांची घोषणा केली आहे. यावेळी भारतीय महिला संघासाठी नव्या कर्णधाराचीही घोषणा करण्यात आली. भारतीय महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा आता सांगलीची लेक २९ वर्षीय स्मृती मानधनाकडे सोपवण्यात आली आहे. तिने यापूर्वी हरमनप्रीतच्या अनुपस्थितीत १८ टी-२० आणि ४ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व केले आहे. तसेच, ती गेल्या अनेक वर्षांपासून उपकर्णधारपद सांभाळत होती. आता तिला कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. २०१३ साली स्मृती मानधनाने भारतासाठी पदार्पण केले होते. ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी महिला फलंदाज आहे. तिने ११ हजार धावांचा टप्पा पार केला आहे. ती २०२५ एकदिवसीय विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचाही भाग राहिली आहे. तिच्या नेतृत्वात रॉयस चॅलेंजर्स बंगळुरू संघाने वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेचे २०२४ आणि २०२६ या दोन हंगामाचे विजेतेपदही जिंकले आहे. त्यामुळे तिच्याकडे चांगला अनुभव आहे.



### भुवनेश्वर कुमारचे पुनरागमन

नवी दिल्ली : भारताच्या टी-२० संघात वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारचे तब्बल चार वर्षांनी पुनरागमन झाले आहे. तो भारतासाठी अखेरचा नोव्हेंबर २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्येच टी-२० सामना खेळला आहे. न्यूझीलंडमधील वातावरण पाहाता भुवनेश्वरची स्विंग गोलंदाजी महत्त्वाची ठरू शकते. भुवनेश्वर कुमारने गेल्या काही महिन्यांत दमदार कामगिरी करत पुनरागमनासाठी दावेदारी ठोकली होती. त्याने २०२५ आणि २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आयपीएल जिंकून देण्यातही मोलाचा वाटा उचलला. त्याने २०२५ आयपीएळ हंगामात १४ सामन्यात १७ बळी घेतले होते, तर २०२६ हंगामात १६ सामन्यात २८ बळी घेतले होते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने त्याच्या पुनरागमनाची चर्चा होत होती. अखेर त्याला आता पुनरागमनाची संधी मिळणार आहे. दरम्यान, फिरकीपटू वरुण चक्रवर्ती दुखापतीतून सावरला असल्याने त्यालाही पुन्हा टी संघात संधी मिळाली आहे. त्यामुळे रवी बिश्नोईला संघातून वगळण्यात आले आहे. जसप्रीत बुमराहला वनडे आणि कसोटी मालिकेचा विचार करता टी मालिकेतून विश्रांती देण्यात आली आहे.

# भारताचा वेस्ट इंडिजवर दणदणीत विजय

- **कर्णधार श्रेयस अय्यरचं वादळी शतक**
- **नमन धीरचा भीम पराक्रम**





**। लखनऊ । वृत्तसंस्था ।**

लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा ८ गडी राखून पराभव केला. या सामन्यात भारताच्या विजयाचा हिरो कर्णधार श्रेयस अय्यर ठरला. त्याने अवघ्या ४२ चेंडूंमध्ये शतक पूर्ण करून १०२ धावांवर नाबाद राहिला. अय्यरचे हे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले शतक असून, भारतासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४२ चेंडूंमध्ये शतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत त्याचा समावेश झाला आहे. तसेच, भारताकडून पदार्पण करणाऱ्या नमन धीरने सर्वाधिक ३ बळी घेत भीम पराक्रम केला आहे.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजला भारतीय गोलंदाजांनी १७१ धावांवर रोखले. यावेळी भारतीय फिरकी गोलंदाजांनी निर्णायक भूमिका बजावली. वेस्ट इंडिजकडून कर्णधार शाई होपने ३७ चेंडूंमध्ये ५२ धावांची खेळी केली. त्याने ६ चौकार आणि २ षटकार मारले. तसेच, शेर्फेन रदरफोर्डनेही ३४ चेंडूंमध्ये ५६ धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, अखेर भारतीय गोलंदाजांनी वेस्ट इंडिजचा डाव १७१ धावांवर गुंडाळला. यावेळी भारताकडून पदार्पण करणाऱ्या नमन धीरने सर्वाधिक ३ बळी घेतले. तर, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेत वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच, अर्शदीप सिंगनेही एक बळी घेतला.

त्यानंतर १७२ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या भारताची सुरुवात मात्र फारशी चांगली झाली नाही. सलामीवीर अभिषेक शर्मा २१ धावांवर, तर संजू सॅमसन फक्त ११ धावांवर बाद झाला. त्यामुळे भारताची धावसंख्या ३५ असताना दोन्ही सलामीवीर तंबूत परतले होते. मात्र, त्यानंतर श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांनी डाव सावरला. दोघांनी आक्रमक फलंदाजी करत वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला आणि भारताला १४.४ षटकांत दोन गडी गमावून सहज विजय मिळवून दिला. यावेळी कर्णधार श्रेयस अय्यर याने अवघ्या ४२ चेंडूंमध्ये शतक पूर्ण करून १०२ धावांवर नाबाद राहिला. यावेळी श्रेयस अय्यरने टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले आहे. त्याने १० चौकार आणि ६ षटकारांची आतषबाजी केली. तसेच, किशनने नाबाद ३७ धावा केल्या.

### आयसीसीच्या क्रमवारीत मोठी झेप

आयसीसीने बुधवारी (दि.७) पुरुष टी-२० आंतरराष्ट्रीय खेळाडूंची क्रमवारी जाहीर केली. त्यामध्ये भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरला सर्वाधिक फायदा झाला आहे. त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या सामन्यात नाबाद शतकी खेळी केली. त्यामुळे त्याने आयसीसी क्रमवारीत १८ स्थानांची झेप घेतली. त्यामुळे तो आयसीसी टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्यांदाच पहिल्या दहामध्ये पोहोचला असून, ७८६ रेटिंग पॉइंटसह सातव्या स्थानी पोहोचला आहे. त्यामुळे आता आयसीसी टी-२० पुरुष फलंदाजांच्या पहिल्या दहामध्ये इशान किशन पहिल्या, अभिषेक शर्मा दुसऱ्या, अय्यर सातव्या आणि तिलक वर्मा दहाव्या असे भारताचे चार खेळाडू आहेत.

### नमनची पदार्पणातच दमदार कामगिरी

या सामन्यात भारतासाठी अष्टपैलू नमन धीरने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले असून, पहिल्याच सामन्यात दमदार कामगिरी केली आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने चांगली फलंदाजी केली. मात्र, नमन धीरने त्याच्यासह वेस्ट इंडिजचे महत्त्वाच्ये बळी घेतले. यावेळी नमनने होप (५२) याला अर्धशतकानंतर फार काळ टिकू दिले नाही. त्यानंतर नमनने धोकादायक रोमरियो शेफर्डलाही ७ धावांवर आणि शामर स्पिंगरला ९ धावांवर माघारी धाडले.

# पीएनपी माध्यमिक शाळेचे उज्ज्वल यश




- **विना शूज धावतही गाठली अंतिम फेरी**
- **उल्लेखनीय कामगिरीबद्दल चित्रलेखा पाटील यांच्याकडून कौतूक**

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील एच.ओ.सी. रसायनी येथे नुकत्याच रायगड जिल्हा क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मुरुड तालुक्यामधील काळघर येथील पी.एन.पी. माध्यमिक विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्पर्धेत उत्तम यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत काळघार पी.एन.पी. माध्यमिक विद्यालयाने १४ वर्षांखालील मुलींच्या ४०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. तर, अनुष्का महाडिक हिने उंच उडीत तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर १७ वर्षांखालील मुलींमध्ये २०० मीटर धावण्यात आर्या पवार तृतीय, तर उंच उडीमध्ये अंतरा गौतडे हिने चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, काही विद्यार्थिनींनी विना शूज धावतही अंतिम फेरीपर्यंत मजल मारल्याने त्यांच्या जिद्दीचे व क्रीडाकौशल्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाहक चित्रलेखा पाटील, शाळेचे चेअरमन संतोष कांबळी, सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती, सुरेश नांदगावकर, सिताराम ठाकूर, मुख्याध्यापक मनोज सुर्वे, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### विराट कोहलीला रँकिंगमध्ये फटका

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज विराट कोहली अलीकडेच वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत खेळताना दिसला होता. कोहलीने पहिल्या सामन्यात नाबाद १३९ धावांची खेळी केली होती. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात तो २९ धावांवर, तर तिसऱ्या सामन्यात खातेही न उघडता बाद झाला. त्यामुळे कोहलीला रँकिंगमध्ये नुकसान सहन करावे लागले आहे. बुधवारी (दि.७) आयसीसीने ताजी रँकिंग जाहीर केली, त्यामध्ये कोहली एका स्थानाने खाली घसरला.त्यामुळे एकदिवसीय फलंदाजीच्या रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावर असलेला कोहली आता तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

# मुंबईच्या सुपुत्राचा गौरव



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेत देदीप्यमान कामगिरी करत सुवर्णपदकाला गवसणी घालणाऱ्या भारतीय हॉकी संघातील गोलरक्षक आणि मुंबईचा सुपुत्र सूरज करकेरा याच्या यशाचा मुंबईत विशेष गौरव करण्यात आला. विधान परिषदेचे उपसभापती तसेच हॉकी मुंबई सिटीचे अध्यक्ष सचिन अहिर यांनी विधान भवन येथे सूरज करकेराची सदिच्छा भेट घेऊन त्याचा विशेष सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपसभापती सचिन अहिर यांनी सूरजच्या उत्कृष्ट गोलरक्षणाचे कौतुक करत संपूर्ण भारतीय हॉकी संघाच्या ऐतिहासिक विजयाबद्दल आनंद व्यक्त केला. हॉकी मुंबई सिटीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी सूरज करकेरा याला ५० हजार रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित केले. या विशेष सत्कार समारंभास हॉकी मुंबई सिटीचे कोषाध्यक्ष शृंगार तारक राऊळ, अर्जुन पुरस्कार विजेत्या हेलन सोय (वेरी), आंतरराष्ट्रीय हॉकीपटू मनोरमा, तसेच संस्थेचे सभासद देवेंद्र कांबळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

### ओम पावशेची कुमार गटात निवड

**। खांब । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्हा कुमार गट निवड व अजिंक्यपद चाचणी कबड्डी स्पर्धेत रोहा येथील जय बजरंग क्रीडा मंडळाच्या कुमार गट संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेत ओम पावशे याने आक्रमण आणि बचाव या दोन्ही विभागांत प्रभावी खेळ करत संघाच्या कामगिरीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. ओमच्या या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीची दखल घेत त्याची रायगड जिल्हा कुमार गट कबड्डी संघात निवड करण्यात आली आहे. आता तो पालघर येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य निवड व अजिंक्यपद कुमार गट कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# जलतरण स्पर्धेत अर्णव सकपाळ प्रथम

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हि स्पर्धा माणगाव-निजामपूर येथील बी.टी. स्पोर्टस ॲकेडमीच्या जलतरण तलावावर पार पडली असून, या स्पर्धेत रोहा येथील जे.एम. राठी स्कुलचा अर्णव सकपाळ याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याने २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये प्रथम, तर १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता कायम टिकवून ठेवत त्याने आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. कुमार अर्णव याला प्रशिक्षक भूषण शिर्के यांचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. अर्णवच्या या जिल्हास्तरावरील प्राविण्यानंतर त्याची आता विभागीय पातळीवर अधिकृत निवड झालेली आहे. त्यामुळे त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वच ठिकाणाहून कौतुक होत आहे.



# वडके विद्यालयाची दमदार कामगिरी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नुकतेच एच.ओ.सी. येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत चोंढी-किहीम येथील श्री. स.म. वडके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यावेळी त्यांनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.

या स्पर्धेतील १७ वर्षांखालील गटात ५००० मीटर चालण्यात कृतिक बांद्रे याने द्वितीय तर, चैतन्य घरत याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, १९ वर्षांखालील गटात भालाफेकीत ईश्वरी पिसाळ द्वितीय क्रमांक, लांब उडीत नीती ठाकूर तृतीय, ३००० मीटर चालण्यात गौसिया किरकिरे तृतीय, ११० मीटर हर्डल्समध्ये प्रथमेश भगत प्रथम, ५००० मीटर चालण्यात मोहित बोबटकर तृतीय, १०० आणि ४०० मीटर हर्डल्समध्ये मैथिली मसुरकर हिनू द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये नियती पवार, देविका पवार, कस्तुरी पवार व खुशी नाईक या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, ४ बाय ४०० मीटर रिलेमध्ये नीती ठाकूर, प्रिया चिंबुलकर, मैथिली मसुरकर व भाविका राऊत या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यामुळे खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**प्रतिनिधित्व करताना अफाट ताकदीचे प्रदर्शन | ४६५ किलो वजन उचलून पटकावला प्रथम क्रमांक**

# वेदांत नागवेकरची सुवर्णमय कामगिरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथील रहिवासी आणि सध्या मुंबईतील चांदिवली येथे वास्तव्यास असलेल्या वेदांत नागवेकर या १७ वर्षीय युवा पॉवरलिफ्टरने राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. आपल्या जबरदस्त ताकदीच्या जोरावर त्याने सुवर्णपदकासह स्पर्धेतील सर्वोच्च असा ''स्ट्राँगमन ऑफ महाराष्ट्र'' हा प्रतिष्ठेचा बहुमान पटकावला असून, रायगड जिल्ह्यासह क्रीडा विश्वात त्याचे नाव गाजत आहे.



नेरूळ येथील जुहू नगरमधील गणेश मंदिर हॉल येथे दि.२ ते ४ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आणि नवीमुंबईपॉवरलिफ्टर्सअसोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप अँड सिंगल इव्हेंट बेंचप्रेस व डेडलिफ्ट कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी अधिकृत निवड चाचणी म्हणून घेण्यात आली होती. या राज्यस्तरीय स्पर्धेत वेदांतने ६६ किलो सब-ज्युनिअर गटात नवी मुंबईचे प्रतिनिधित्व करताना अफाट ताकदीचे प्रदर्शन केले आहे. त्याने स्कॉट्स १७५ किलो, ८० किलो आणि २१० किलो असे एकूण तब्बल ४६५ किलो वजन यशस्वीरीत्या उचलून त्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. याशिवाय सिंगल इव्हेंट डेडलिफ्ट स्पर्धेतही त्याने २१० किलो वजन उचलून सुवर्ण कामगिरी नोंदवली आहे. या अष्टपैलू व विक्रमी प्रदर्शनामुळे त्याला मान्यवरांच्या हस्ते ''स्ट्राँगमन ऑफ महाराष्ट्र'' हा बहुमान देऊन गौरविण्यात आले.

वेदांत नागवेकरच्या यशाची ही मालिका सातत्यपूर्ण राहिली आहे. यापूर्वी दि.४ व ५ जुलै रोजी मुंबईतील पवई येथील हिरानंदानी गार्डन्स महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या माध्यमातून पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील पात्रता स्पर्धेतही त्याने उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्या स्पर्धेत अवघ्या १७ वर्षीय वेदांतने ६७.५ किलो सब-ज्युनिअर गटात सहभाग घेऊन स्कॅटमध्ये १७५ किलो, बेंचप्रेसमध्ये ७५ किलो आणि डेडलिफ्टमध्ये २०० किलो असे एकूण ४५० किलो वजन उचलत उत्कृष्ट प्रदर्शन केले होते. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत देशभरातील अव्वल खेळाडूंमध्ये त्याने आपले वेगळे स्थान निर्माण केले होते.

अवघ्या १७व्या वर्षी एकामागून एक विक्रमी कामगिरी करत असलेल्या वेदांतच्या यशाने संपूर्ण रायगडच्या क्रीडा विश्वात अभिमानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही तो देशपातळीवर महाराष्ट्राचा आणि देशाचा तिरंगा फडकवेल, असा विश्वास क्रीडाप्रेमी व जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

# अवघ्या पाच चेंडूंत विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत 'अ' संघाने एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलिया 'अ' संघाचा पराभव केला. भारताच्या १९ वर्षांखालील संघाने ही विजयी मालिका कायम राखताना बुधवारी (दि.७) ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धची दुसरी कसोटी ५ चेंडूंत जिंकली. तन्मन बलोडा ने दोन्ही डावांत मिळून १४ बळी घेतले आणि भारतासमोर विजयासाठी केवळ ११ धावांचे लक्ष्य कांगारूंना ठेवता आले. भारताने ही मालिका २-० अशी खिशात घातली.

यावेळी तन्मयने पहिल्या डावात २५-११-३२-६ अशी स्पेल टाकून ऑस्ट्रेलियाला १७४ धावांवर गुंडाळले. पाहुण्याकडून चार्ली हेंडरसन (३७) व नील पटेल (३१) यांनी सर्वाधिक धावा केल्या. तन्मयला अयान अक्रमने दोन बळी घेत चांगली साथ दिली. भारताने प्रत्युत्तरात पहिल्या डावात ३१५ धावा उभ्या केल्या. कर्णधार यशवर्धन चौहान (५२) व अभिप्राय बिस्वास (७३) यांनी अर्धशतकं झळकावली. मनल चौहान (३४), आर्यन यादव (३०) व प्रियांशू सिंग (नाबाद ३०) यांनी चांगला खेळ केला. ऑस्ट्रेलियाच्या स्पेन्सर ग्रीनने ७ बळी घेतले. मात्र, फलंदाजांनी पुन्हा निराश केले. तन्मच्या गोलंदाजीसमोर त्यांनी शरणागती पत्करली. ब्लॉक कॅटल (६३) व एलि ब्रेन (३९) यांचा संघर्ष सोडल्यास ऑस्ट्रेलियाकडून कोणीच फारकाळ टिकले नाही. तन्मयने या सामन्यात १४ बळी घेतले. प्रियांशू सिंगने दोन बळी घेतले आणि ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव १५१ धावांवर गडगडला. भारताने ११ धावांचे लक्ष्य अवघ्या पाच चेंडूत पार केले. लक्ष्य रायचंदानीने ४ चेंडूत ९ धावा कुटल्या आणि संघाला १० गडी राखून विजय मिळवून दिला.

### वैभव सुर्यवंशी बाकावरच

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने पहिल्या टी-२० सामन्यात दणदणीत विजय मिळविल्यानंतर वैभव सूर्यवंशीला बाकावर बसवल्याचा मुद्दा चर्चेत राहिला आहे. आता दुसरा सामना दि.९ ऑक्टोबरला होणार आहे आणि त्यात खेळाडूंमध्ये बदल करण्याची शक्यता आहे. त्यावर दिनेश कार्तिकने सांगितले की, संघ व्यवस्थापन या मालिकेत जास्तीतजास्त खेळाडूंचा प्रयोग करण्याचा प्रयत्न करणार आहे. वैभव सूर्यवंशी हा वर्ल्ड चॅम्पियन फलंदाज आहे आणि त्याच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले असेल, परंतु त्याने या स्तरावर अजून स्वतःला सिद्ध केलेले नाही. पण, त्याला रोखणे अवघड आणि बाकावर बसवून त्याच्यातरी ती भूक आणखी वाढली असेल, असे दिनेश कार्तिक म्हणाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)